RNI NO. MAHMAR/2020/84035




# BAHUJAN SAURABHA
# बहुजन सौरभ




बुधवार ०६ ऑगस्ट २०२५ | वर्ष : ५ | अंक : १४० | दैनिक | किंमत : ₹ ५/-
Wednesday 06 August 2025 | Year : 5 | Issue : 140 | Daily | Rate: Rs. 5/-

# सामाजिक जबाबदारीतून दै. बहुजन सौरभ घरोघरी जाईल ...

## संवाद मित्रांचा मैत्री मेळावात एकमुखी सूर

**नागपूर :** डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आम्हाला वृत्तपत्राचे महत्व कृतीतून सांगितले आहे. त्यांच्या प्रेरणेतून दैनिक बहुजन सौरभ सुरू झाले आहे. मी, माझे मित्र दै. बहुजन सौरभ घेतील इतका पाठपुरावा करू असे जेष्ठ प्रबुद्ध नागरिक नीलकंठ बहादूरे यांनी उद्घाटन पर सांगितले आहे. बौद्ध विहारातून मैत्री निर्माण होते. म्हणून विहार हे चळवळीचे केंद्र झाले पाहिजे. विहारात दै. बहुजन सौरभ आला पाहिजे आणि वाचला पाहिजे असे डी. आर. कांबळे यांनी सांगितले. घरोघरी पेपर लावा, यासाठी मी घरोघरी जातो खूप अनुभव आले आहे. नागपुरात मोठ्या प्रमाणावर गेला पाहिजे, यासाठी माझा संवाद असतो. असे स्तंभलेखक श्रीराम बनसोड म्हणाले. तर आपले वृत्तपत्र घ्या आणि इतरांना सांगा, असे सखाराम मंडपे यांनी सांगितले. नीतिमूल्ये असलेले लेखन आपल्या वृत्तपत्रात असते असे प्रा. यशवंत दुपटे तर नागपुरात आंबेडकरी एक लाख घरे असतील, त्यापैकी 25 हजार घरांनी जरी पेपर घेतला तरी खूप मोठे काम होईल, कल्याणमित्र नरेश धोपटे यांनी सांगितले. लेखनासोबत आर्थिकदृष्ट्या मदत करणे हे लेखकाचे कर्तव्य आहे असे डॉ. सुनंदा जुलमे यांनी सांगितले. वृत्तपत्राचा प्रचार आणि प्रसार झाला पाहिजे तो मी करणार असे ॲड. सुरेश घाटे म्हणाले, तर दै. बहुजन सौरभ पाच वर्षांत वाचकांचा




विश्वासपात्र झाला आहे तर येथे प्रकाशित होणारे लेख हे संदर्भासाठी आवश्यक असतात, असे वाचक सांगतात. असे कार्यकारी संपादक विलास गजभिये यांनी सांगितले. लेखकांची नवीन पिढी बहुजन सौरभ घडवित आहे असे प्रा. प्रिति तिरपुडे म्हणाल्या. काशी नगर परिसरात बहुजन सौरभ मोठ्या प्रमाणावर येतो असे सुधाकर स्थूल यांनी सांगितले. दै. बहुजन सौरभसाठी मी आतापर्यंत पन्नास लोकांना फोन केला, असे रिपब्लिकन कार्यकर्ता नानाजी ढेंगरे यांनी सांगितले. महिलांनी वृत्तपत्रासाठी पुढे आले पाहिजे असे अन्नपूर्णा दुपटे तर सर्वांनी एकत्र येऊन पुढाकार घेतला पाहिजे असे कवी विशाखा नकाशे यांनी सांगितले.

नुकताच तथागत बुद्ध विहार कशी नगर, नागपूर येथे मेळावा पार पडला. मेळाव्याच्या अध्यक्ष भदंत नागदीपंकर, उद्घाटक निलकंठ बहादुरे, कार्यकारी संपादक विलास गजभिये, डी. आर. कांबळे, सुधाकर स्थूल, श्रीराम बनसोड, सखाराम मंडपे, ॲड. सुरेश घाटे, आदी उपस्थित होते. दै.बहुजन सौरभ चे नवे भागधारक प्रा. यशवंत दुपटे, डॉ. सुनंदा जुलमे बोरकर, नरेश धापटे यांनी आपले मनोगत व्यक्त केले. त्यांचे स्वागत करण्यात आले. सामाजिक बांधिलकी म्हणून वृत्तपत्राला लोकांपर्यंत घेऊन जा असे ख्यातनाम भिक्खू भदंत नागदिपंकर यांनी अध्यक्षीय भाषणात सांगितले. विठ्ठल पाटील, गुणवंत कोसारे, भागवन निमगडे यांनी मनोगत व्यक्त केले. कवी प्रा. भीमराव गायकवाड, साहित्यकार भूपेश वराडे, नरेश मेश्राम, राजकुमार वंजारी, विनोद आटे, कृष्णा बोरकर, भीमराव म्हैसकर, शुद्धोधन बडवने, चंद्रकला रामटेके, संगीता चव्हाण, दिपिका कांबळे, लक्ष्मण बोरकर, सिंधू स्थूल, जया ढेंगरे, लता गारसे, ताई सरदार, विजय तागडे, सेनापती नरांजे, संघपाल शंभरकर, नानाजी ढेंगरे, मनोज कांबळे, विनोद आटे, मालती वराडे, सुनिता पाटील, चेतन भगत, बळीराम भालेराव, रुपचंद मानडे, चेतन भगत, अमन खोब्रागडे आदी उपस्थित होते.

क्षणचित्रे :- नागपुरातील विविध भागातून संवाद मित्र उपस्थित झाले होते. महिलांची उपस्थिती पुरुषांच्या बरोबरीने होती. बहुजन सौरभला घरोघरी घेऊन जाण्यासाठी उत्तर नागपुरात प्रयत्न करण्यात येईल असे उत्तर नागपुरातील भागधारकांनी सांगितले.

# उत्तरकाशीमध्ये 34 सेकंदात सर्व गावे पाण्याखाली

## उत्तरकाशी जिल्ह्यातील धराली गावात ढगफुटी







**उत्तरकाशी :** उत्तरकाशीमध्ये खीरगंगा येथे मोठा पूर आला. या आपत्तीत आतापर्यंत चार जणांचा मृत्यू झाला आहे. उत्तरकाशीमध्ये ढगफुटी, खीरगंगेत पूर, अनेक लोक ढिगाऱ्याखाली दबले.

अरे गंगा मैया, काय झाले, मला माफ कर... उत्तरकाशीमध्ये धाराली बाजार आणि गाव आक्रोशांनी गुंजले. आज धारालीमध्ये निसर्गाचा कोप दिसून आला. हॉटेल्स आणि दुकाने ढिगाऱ्याखाली गाडली गेली. खीरगंगेचे पाणी आणि ढिगाऱ्याने सर्व काही वाहून नेले.

आतापर्यंत या अपघातात चार जणांचा मृत्यू झाल्याची पुष्टी झाली आहे. तर अनेक लोक गाडले गेल्याचे वृत्त आहे. उत्तराखंडमधील उत्तरकाशी जिल्ह्यातील धाराली गावातील खीरगंगा येथे मंगळवारी अचानक ढगफुटी झाल्याने खीरगंगेत आलेल्या पुरामुळे भयानक विनाश झाला. अनेक लोक पुराखाली गाडले गेले आणि ढिगारा गावाकडे सरकला. संपूर्ण परिसरात आक्रोश सुरू होता, धाराली बाजार पूर्णपणे उद्ध्वस्त झाला आहे. मदत पथके घटनास्थळी रवाना झाली आहेत. अनेक हॉटेल्स आणि दुकाने जमीनदोस्त झाली, स्थानिक लोकांचे जनजीवन विस्कळीत झाले. मदत आणि बचाव कार्य सुरू आहे.

उत्तरकाशीमध्ये पावसाचा कहर थांबण्याचे नाव घेत नाहीये. मुख्यमंत्री धामी यांनी धाराली उत्तरकाशी परिसरात ढगफुटीमुळे झालेल्या मोठ्या नुकसानीबद्दल तीव्र दुःख व्यक्त केले.

एसडीआरएफ, एनडीआरएफ, जिल्हा प्रशासन आणि इतर संबंधित पथके मदत आणि बचाव कार्यासाठी युद्धपातळीवर काम करत आहेत. मी या संदर्भात सतत वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या संपर्कात आहे.

उत्तरकाशीमध्ये ढगफुटी झाल्याची प्राथमिक माहिती राज्य आपत्कालीन ऑपरेशन्स सेंटरला मिळाली आहे. उत्तराखंड आपत्ती व्यवस्थापन विभागाने मदत आणि बचाव कार्यासाठी भारत सरकारला दोन एमआय आणि एक चिनूक हेलिकॉप्टर उपलब्ध करून देण्याची विनंती केली आहे.

# जम्मू-काश्मीर, बिहार, मेघालयचे माजी राज्यपाल सत्यपाल मलिक यांचे निधन

**नवी दिल्ली :** जम्मू-काश्मीरचे माजी राज्यपाल आणि ज्येष्ठ नेते सत्यपाल मलिक यांचे मंगळवारी दिल्लीत निधन झाले. त्यांनी वयाच्या 79 व्या वर्षी दिल्लीतील राम मनोहर लोहिया रुग्णालयात अखेरचा श्वास घेतला. मलिक यांच्या निधनाची बातमी कळताच राजकीय वर्तुळात शोककळा पसरली. विविध राजकीय पक्षांच्या नेत्यांनी त्यांना श्रद्धांजली वाहिली.




अशा परिस्थितीत सत्यपाल मलिक यांच्या वैयक्तिक आयुष्याबरोबरच त्यांच्या राजकीय कारकिर्दीबद्दल जाणून घेणे महत्त्वाचे आहे.

सत्यपाल मलिक यांचा जन्म जुलै 1946 मध्ये उत्तर प्रदेशातील बागपत येथील हिसवाडा गावात झाला. त्यांनी मेरठ विद्यापीठातून बीएससीचे शिक्षण घेतले. या काळात त्यांनी विद्यार्थी राजकारणात भाग घेऊ लागला. त्यांनी पुढे कायद्याचे शिक्षण घेतले आणि त्यानंतर मुख्य प्रवाहातील राजकारणात सामील झाले.

जम्मू आणि काश्मीर राजभवनच्या वेबसाइटनुसार, सत्यपाल मलिक यांनी 1965-66 मध्ये राम मनोहर लोहिया यांच्या समाजवादी विचारसरणीने प्रभावित होऊन पहिल्यांदा राजकारणात प्रवेश केला. 2014 मध्ये, मलिक यांना पुन्हा एकदा भाजपमध्ये राष्ट्रीय उपाध्यक्ष म्हणून नियुक्त करण्यात आले. त्यांनी शेतकऱ्यांना भाजपच्या बाजूने आणण्यासाठी अनेक रॅली आयोजित केल्या. हा तो काळ होता जेव्हा सत्यपाल मलिक भाजपसाठी एक महत्त्वाचा नेता म्हणून काम करत राहिले. त्यांना बिहारचे राज्यपाल म्हणून नियुक्त केले.

# शिबू सोरेन यांच्यावर अंत्यसंस्कार

**रांची :** झारखंडचे माजी मुख्यमंत्री आणि झामुमोचे संरक्षक शिबू सोरेन यांच्यावर मंगळवारी त्यांच्या मूळ गावी नेमरा (बोकारो) येथे पूर्ण राजकीय सन्मानाने अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांचे मोठे पुत्र आणि मुख्यमंत्री हेमंत सोरेन यांनी चितेला अग्नी दिला. यावेळी कुटुंबातील सदस्य, काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे आणि लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी मंगळवारी झारखंडची राजधानी रांचीला पोहोचले. आंध्र प्रदेशचे मुख्यमंत्री तेजस्वी यादव आणि इतर अनेक नेते नेमरा येथे पोहोचलेत. झारखंडचे अनेक मोठे नेते आणि मोठ्या संख्येने लोक उपस्थित होते. शिबू सोरेन



यांच्या वहिनी दीपमणी सोरेन यांनी डोळ्यात पाणी आणून सांगितले की बाबांचे जीवन खूप साधे होते. त्यांना साधे जेवण खूप आवडायचे. त्यांना सेंद्रिय ताज्या हिरव्या भाज्यांचे पदार्थ खूप आवडत असत. जेव्हा जेव्हा ते नेम्राला यायचे तेव्हा आम्ही त्यांच्यासाठी शेतातून वांगी, टोमॅटो आणि मुळ्याची पाने आणायचो, कारण त्यांना भाज्या खूप आवडत असत.

# संसदेच्या सुरक्षेत बदल का करण्यात आले?



**नवी दिल्ली :** राज्यसभेतील विरोधी काँग्रेसने आता एक नवा मुद्दा हाती घेतला आहे. राज्यसभेतील विरोधी पक्षनेते आणि काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांनी सभागृहाच्या मध्यभागी सुरक्षा कर्मचाऱ्यांच्या उपस्थितीवर तीव्र आक्षेप नोंदवला आहे. विरोधी पक्षांच्या खासदारांना त्यांच्या मुद्द्यांवर आवाज उठवण्यापासून रोखले जात असल्याचा आरोप त्यांनी केला आहे. खरगे यांनी मागील आठवड्यात राज्यसभेचे उपसभापती हरिवंश यांना पत्र लिहून या मुद्द्यावरून चिंता व्यक्त केली होती. 'सदस्य त्यांच्या लोकशाही हक्कांनुसार निषेध व्यक्त करत असताना सीआयएसएफचे जवान सभागृहाच्या वेलमध्ये धावत आले आणि ते पाहून आम्ही हादरून गेलो आहोत', असे त्यांनी या पत्रात लिहिले आहे. काँग्रेसचे सरचिटणीस आणि राज्यसभेतील मुख्य पक्षप्रमुख जमराम रमेश यांनी आरोप केला की, 'राज्यसभेचे सभापती यांच्या राजीनाम्यानंतर आता राज्यसभेच्या सभागृहावर सीआयएसएफच्या कर्मचाऱ्यांनी ताबा मिळवला आहे.

PROPERTY FOR SALE




Prime Land with Construction for Sale
Wela (Hari), Shankarpur Road, Nagpur (Gramin)
Perfect for Educational Institutions:
Area 0.46 hectares (50,000 Sq. Ft) with construction around 35000 Sq. Ft., Ideal for Schools, College, Training Center, Residential Tution College, Hotel, Hostel, Ambusman Park
Contact : Sulay 9860361121

# स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीचा कार्यक्रम ठरला?



**नाशिक :** सुप्रीम कोर्टाच्या निकालानंतर राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका होण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. त्यात राज्यातील स्थानिक संस्थांच्या निवडणुका दिवाळीनंतर म्हणजेच ऑक्टोबर अखेरीस प्रक्रिया सुरू होईल अशी माहिती राज्य निवडणूक आयोगाचे आयुक्त दिनेश वाघमारे यांनी दिली. आगामी निवडणुकीचा आढावा घेण्यासाठी नाशिकसह उत्तर महाराष्ट्रातील प्रशासकीय अधिकाऱ्यांसोबत बैठक घेण्यात आली. या बैठकीनंतर निवडणूक आयुक्तांनी पत्रकार परिषद घेत निवडणूकपूर्व तयारीची माहिती दिली. राज्य निवडणूक आयुक्त दिनेश वाघमारे म्हणाले की, 4 महिन्याच्या आत निवडणुका घेण्याचे आदेश सुप्रीम कोर्टाने दिले आहेत. त्यानुसार मनपा, जिल्हा परिषद, नगरपालिका अशा सर्व निवडणुकांचा कार्यक्रम टप्प्याटप्प्याने घेण्यात येईल. नाशिकमध्ये 50 लाख 45 हजार मतदार असून 4982 केंद्रे आहेत. सर्व निवडणूक एकत्र घेतल्यास मनुष्यबळाची अडचण भासेल. त्यामुळे वेगवेगळ्या टप्प्यात निवडणूक घेण्यात येईल. पहिल्या टप्प्यात कोणत्या निवडणुका होतील हे अद्याप ठरले नाही असं त्यांनी सांगितले.



“ जीवनातील प्रत्येक दिवस नवीन संधी घेऊन येतो, त्याचा लाभ घ्या... ”

बहुजन सौरभ
BAHUJAN SAURABHA



बहुजन सौरभ **संपादकीय**

# बाबांचे शिलेदार होऊ या !

दैनिक बहुजन सौरभ सुरू करण्यापूर्वी अनेकदा चिंतन केले. इतके मोठे नागपूर शहर आहे. नागलोकांचा इतिहास आहे. डॉ. बाबासाहेबांचे आवडते शहर आहे. येथेच धर्मांतर झाले. पण आपल्या विचारांचे देवाणघेवाण करणारे वृत्तपत्र नाही. अनेक प्रश्न आपल्या मनाला विचारले त्याचे उत्तरही मिळाले. मग कार्य घडण्याच्या आधी विचार जन्माला येतात हे खरेच आहे. कोणाला तरी पुढाकार घ्यावा लागतो. यशाचा विचार करणाऱ्याला यश मिळते. यशस्वी होण्याविषयी शंका उपस्थित करण्यास अपयश मिळते. यशाचे विचार आमच्या तुमच्यात उत्साह निर्माण करतात. मग तुमच्या आमच्या भावना आनंदी बनवतात, तर शंकास्पद विचार तुम्हाला हतोत्साहित करत असतात. अर्थात स्वतःच्या विचारांची दिशा स्वतःलाच कळत असते. म्हणून आपल्याला हव्या त्या दिशेने विचारांना वळवणे महत्त्वाचे असते. परंतु बरेचदा कळते, पण वळत नाही, अशी परिस्थिती निर्माण होते आणि माझ्या मनातच यशाचे विचार येत नाहीत, असा नकारात्मक सूर ऐकायला मिळतो. तुम्हीच स्वतःला नकारात्मक ठरवत असाल, तर तुमच्या अपयशासाठी कोणत्या स्पर्धकाची गरजच उरत नाही. म्हणून कितीही नकारात्मक परिस्थिती असली तरी आशावादी असणे, तसे विचार करणे, त्या विचारांना शक्तिशाली बनवणे महत्त्वाचे असते. सारे काही आपल्या माणसासारखे होईल असे नाही. कधी दोन पाऊल पुढे कधी दोन पाऊल मागे झाले तर यश मिळते. बुद्धिबळ खेळ हे सारे शिकविते. वर्तमानात आपल्यासोबत अशा काही घटना घडतात की, त्या तुम्हाला निराशेत ढकलतात. अशावेळी स्वतःला दुसऱ्या सकारात्मक विचारांत गुंतवण्याऐवजी आपण त्याच घटनांभोवती घुटमळत राहतो आणि मला वाटतच होते, असे काहीतरी घडून येईल, असे म्हणून तुम्ही त्या नकारात्मक विचारांना अधिक शक्तिशाली बनवण्याचे काम करता. त्याऐवजी घडलेल्या घटनेचा स्वीकार करून आजच तुम्ही दुसऱ्या चांगल्या योजनेचे प्लॅनिंग करू शकता. कारण, आजचे विचार तुमचे भविष्य घडवणारे असतात. मग घडलेल्या घटनेबद्दल शोक कशासाठी! हे तत्वज्ञान बुद्ध विचारात दिसते. वर्षावास सुरू आहे. विहारात धम्म विचारांचे सूर गोड मधुर वाणीत घुमतात. विचार करायला लावणारी माणसे शोधावे लागतात. कारण वर्तमानातले विचारच महत्त्वाचे असतात, तेच भविष्यात अस्तित्वात येणार असतात. विचार तुम्हालाच करायचे असतात. यात तुम्हाला दुसरा कोणी मदत करू शकत नाही. तुमचे सकारात्मक विचार तुमच्या मित्राने करून चालणार नाही. चुकीचे संदर्भ आणि तर्क सांगणारे म्हणजे भेसळ, भेसूर साहित्य जन्माला घालतात ते जबरदस्तीने, मुजोरी करून ते क्षणिक आणि फसवेगिरीचे साहित्य लोकांच्या माथी मारत असतात. वाचक इतके मूर्ख नाही की तुम्ही काही लिहा, सांगा तुमच्या चुकीच्या विचारांना खोडून काढवे लागेल. फसवणूक करणाऱ्यांची साथ सोडविण्यासाठी मनाची तयारी पाहिजे. तर तुम्हाला येईल. यश हवंय ना, मग यशाचा विचारही तुम्हालाच करावे लागेल. तुमच्या यशाच्या सकारात्मक विचारांशी दुसऱ्याला काही घेणे-देणे नाही. एखादा असा प्रसंग घडला की, आपले विचार डळमळतात. सामान्य मनुष्याच्या जीवनात ही बाब साहजिक असते. म्हणून स्वतःला प्रत्येक परिस्थितीत सकारात्मक ठेवण्यासाठी प्रेरक पुस्तकांची साथ महत्त्वाची असते. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी लेखन केलेले साहित्य वाचनासाठी वेळ कमी पडेल इतके विपुल साहित्य आज सर्व भाषेत उपलब्ध आहे. जेव्हाही विचार डळमळायला लागतील तेव्हा अशा पुस्तकरूपी मित्राला जवळ घ्या बघा माणूस माणूस म्हणून जगू लागतोय. पुन्हा पुन्हा वाचा. बुद्ध आणि त्यांचा धम्म, मिलिंद प्रश्न, भारतीय संविधान, जातक कथा, जाती व्यवस्था, मूकनायक, बहिष्कृत भारत, जनता, समता, प्रबुद्ध भारत वृत्तपत्र खंड, भाषणाचे खंड आणि बरेच काही वाचनातून नक्कीच आनंद मिळेल. वाचन संस्कृती ही जिंदाबाद आहे आणि जिंदाबाद राहील. कारण मराठी निराशेच्या दारात उभे झाले. त्याला ऊर्जा देणेचे काम दलित साहित्याने केले. नंतर सरकारने दलित शब्दावर बंदी घातली होती. दलित साहित्याचे नामांतर आंबेडकरी साहित्य झाले. तर मग आपल्याकडे भरपूर वेळ असतो आणि त्या वेळेचा सदुपयोग करण्याची शक्तीही आपल्यातच असते. टीव्ही, व्हॉट्सॲप, फेसबुक, इंस्टाग्राम इत्यादी बघण्याचे अनेक बहाणे तुमच्या पुढ्यात असतात. आपणही त्या बहाण्यात अडकतो आणि फक्त दहा मिनिटे ते बघायला काय हरकत आहे, असे म्हणून त्या अनावश्यक गोष्टींच्या नादी लागतो. दहा मिनिटांचे रूपांतर कसे तासा-दोन तासांत होते ते कळत नाही. मग रात्र झाली म्हणून तुम्ही ते वाचन उद्यावर ढकलता. हे आमचे चिंतन आहे. प्रत्येक क्षणाचा सदुपयोग आणि प्रत्येक क्षणाला सकारात्मकता गरजेची असते. शेवटी तुमच्या विचारांचे तुम्हीच मालक असता. वर्षावास काळ हा ज्ञानग्रहण करण्याचा काळ आहे. सर्वत्र वाचन महोत्सव आयोजित करून बुद्ध, कबीर, फुले, शाहू, गाडगेबाबा, आंबेडकर यांच्या विचारांचा जागर करावा ही तुमची आमची जबाबदारी आहे. या करिता बाबांचे शिलेदार होऊ या! ■ ■

# ज्वलंत समस्यांचे विस्मरण, निरर्थक वाद आणि सत्तेसाठी राजकारण

**देशातील इतर राज्यांच्या तुलनेत महाराष्ट्र राज्य हे विकसित राज्य समजले जात असलेतरी, राज्यातील वर्तमान अंतर्गत परीस्थिती ही अत्यंत चिंताजनक असून, त्यात भिन्न विचारधारा असतांनाही, सत्तेच्या हव्यासापोटी एकत्र आलेले तीन पक्ष म्हणजे तीन तिघाडा, काम बिघाडा, अशा स्थितीत राज्यकारभार चालला असून, त्यांची कार्यपद्धती बघता त्यांच्यात कुठेच एकवाक्यता दिसून येत नाही, उलट तीन पक्षाच्या नेत्यांचे, मंत्री, खासदार, आमदारांचे बेताल व अनियंत्रित वक्तव्य तीन दिशेने आपापल्या पक्षहिताचे व इतरांच्या जिव्हारी लागणारे असतात, सोबतच त्यात दिवसागणिक विविध कारणांनी कलहाच्या रूपाने ठिणगी पाडणारेच असतात.**

सत्तेमध्ये सामील असलेले एकापेक्षा अनेक राजकीय पक्ष असल्याने येणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका डोळ्यासमोर ठेवून प्रत्येक पक्ष आपापली घोडे दामटवण्याचा प्रयत्न करीत असून ते पक्ष फोडाफोडीचे धोरण अंगिकारून आणि कमजोर कळ्यांना हेरून त्यांचे पक्षप्रवेश करवून घेण्याचे सत्र सत्ताधारी पक्षातील सहभागी पक्षाचे राबवून आपल्या पक्षाचे संख्याबळ वाढविण्याचा आटोकाट प्रयत्न करीत आहेत. अर्थातच सत्तेत सहभागी असलेल्या पक्षाचे मंत्री अथवा पालकमंत्री असल्याने त्यांचे राज्यात होणारे दौरे म्हणजे दिसायला सरकारी परंतु काम मात्र पक्ष बांधणीचे असेच काहीसे राजकीय चित्र राज्यातील जनतेच्या अनुभवास येत आहे. राज्यातील अत्यंत महत्त्वाची समजली जाणारी मुंबई महानगर पालिका निवडणूक तसेच इतर येऊ घातलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूका डोळ्यासमोर ठेवून विविध पक्षांची मोर्चेबांधणी जोरात सुरू झाली आहे. त्यातच मराठी आणि हिंदी हा भाषिकवाद नव्याने उफाळून आल्याने मुंबईतील जनजीवन विस्कळित झाले आहे. राज्यात शेतकऱ्यांच्या आत्महत्यांची वाढत असणारी संख्या, त्यामुळे हवालदिल व चिंताग्रस्त असलेले शेतकरी



रतन तायडे
94201 25761

कुटूंबिय तसेच शासनाच्या विविध खात्यात हजारोंच्या संख्येने रीक्त असलेली पदे भरली जात नसल्याने संभ्रमित आणि चिंताग्रस्त बनत चाललेले सुशिक्षित बेरोजगार जे पदभरतीची चातकासारखी प्रतिक्षा करीत आहेत. पदभरतीच्या विलंबाने पात्रता असतांनाही अनेकांची वयोमर्यादा कालबाह्य होण्याचा धोका निर्माण झाल्याने नजिकच्या काळात पदभरती लांबणीवर गेल्यास कितीतरी सुशिक्षित बेरोजगारांचे भविष्य अंधःकारमय होण्याची शक्यता नाकारता येत नाही. शेतकऱ्यांच्या समस्यांकडे सरकारने पाठ फिरवली असून, सरकार मदतीचे वेळोवेळी आश्वासन देऊन वेळ मारून नेत आहे. आधीच कर्जबाजारी आणि त्यात निसर्गाची अवकृपा त्यामुळे अन्नदात्या शेतकऱ्यांची आर्थिक स्थिती भयंकर चिंताजनक बनली आहे. त्यातच मुलामुलींचे विवाह तर काहींच्या शाळा, महाविद्यालयाचा एकूण खर्च व कुटूंबातील सदस्यांच्या आकस्मिक आजारावरील खर्च शेतकरी बांधवांच्या आवाक्याबाहेर जात असल्याने ते साहजिकच आर्थिक खाईत लोटले जातात आणि त्यातून वाढत्या विवंचनेतून ते आत्महत्या सारख्या दुर्दैवी प्रसंगाला सामोरे जातात. राज्यात कधी नव्हे इतका भ्रष्टाचार वाढला असून गुन्हेगारीने कळस गाठला आहे, महिला, तरूणीवर कौटुंबिक अत्याचार तसेच विनयभंग, बलात्कारांनी समाज ढवळून निघत आहे. दिवसा ढवळ्या खुन पडत आहेत, चोऱ्या, मारामाऱ्या नित्याच्याच घडत आहेत, जाती-जातीत मतभेद निर्माण केल्या जात आहे, धर्मांधता वाढिस लागली आहे. खंडणी, लाचखोरीला उधाण आले आहे. अशा सर्व समाज विघातक कृत्यावर सरकारचे नियंत्रण राहिलेले नसून सारा कारभार अनियंत्रित बनला आहे. अनेक ठिकाणी सत्ताधाऱ्यांच्या वरदहस्ताने हुकूमशाही पद्धतीने जनतेवर दबाव आणला जातो तर कुठे सत्ताधाऱ्यांचा लाखोंचा भ्रष्टाचार, कितीतरी कोटींचा अनधिकृत भूखंड व्यवहार जगजाहीर होऊन सुद्धा दाबल्या जातो. अनेक सत्ताधाऱ्यांकडून अनधिकृत व्यवहार होत असल्याने सरकारचेच आर्थिक नुकसान होत असल्याचे दिसून येते, अनधिकृत वाळू उपसा, गौण खनिजे इत्यादींची चोरी म्हणजे सरकारचेच आर्थिक नुकसान असते, त्यामुळे अशा बाबी सरकारी वरदहस्ताने दाबल्या जात आहेत,




सरकारच्या लोकोपयोगी योजना, उपक्रम जसे वैद्यकीय उपचार सवलतीमध्ये रूग्णालयात उपचार घेतांना रूग्णाला आवश्यक नसतांनाही सवलतीच्या नावावर केस बनवून घेतली जाते ज्याचा फायदा रूग्णाला न होता खाजगी रुग्णालयांना होतो, लाडकी बहिण योजना पूर्णता बारगळली असून त्या योजनेचा फायदा गरजूपेक्षा इतरांनीच घेतल्याचे दिसून आले आहे. राजकीय पक्षांना केवळ सत्ता हवी असल्याने संख्याबळ वाढविण्यासाठी त्यांचा प्रयत्न चालू असतो, तो प्रयत्न करतांना आपल्यात किती गुन्हेगार, भ्रष्टाचारी, गुंड प्रवृत्तीचे, पोलिस दप्तरी गुन्हा दाखल असलेले सदस्य सामील झाले आहेत याची कल्पना असूनही पक्ष प्रमुख डोळेझाक करतात, कारण त्यांनी सुद्धा सत्ता हस्तगत करण्यासाठी कुणाच्या पाठीत खंजीर खुपसला असतो, धन्याचे घर फोडलेले असते, अर्थातच सत्तेसाठी माणुसकी गहाण ठेवत कुणाशी तरी गद्दारी करून सत्ता हासिल केलेली असते, त्यामुळे सर्वच एका माळेचे मणी असल्याने कोण कुणाला दोष देणार? शेवटी हा खरा प्रश्न उरतो. तसेही राजकारणात कायम कुणी कुणाचा मित्र अथवा शत्रू नसतो, त्यामुळे राजकारण्यांकडून प्रामाणिकपणा, पक्षनिष्ठा, विश्वासार्हता इत्यादींची अपेक्षा करणेच चुकीचे ठरते. जेथे कोणत्याही कारणाशिवाय खरेखोटे निर्णय घेतले जातात व धोरणे ठरविले जातात त्याचेच नाव राजकारण असे म्हटले तरी वावगे ठरणार नाही. ■ ■



**संघर्षातून उभारलेले नेतृत्व अन् झारखंडचा शिल्पकार**

# शिबू सोरेन

भारतीय राजकारणात अनेक नेते आले, गेले, काहींचे अस्तित्व विस्मरणात गेले, तर काहींनी इतिहास घडवला. झारखंडच्या मातीचा पुत्र शिबू सोरेन यांचे नाव नोंदवले जाते ते दुसऱ्या प्रकारात, जे इतिहास घडवतात. 'गुरुजी' या नावाने प्रसिद्ध असलेले शिबू सोरेन हे केवळ एक राजकारणी नव्हते, तर ते झारखंडमधील आदिवासी समाजासाठी प्रकाशाचा किरण होते. त्यांचे संपूर्ण जीवन संघर्षाचे, स्वाभिमानाचे आणि सामाजिक न्यायाच्या लढ्याचे प्रतीक आहे.

**एक क्रांतिकारी सुरुवात :-** शिबू सोरेन यांचा जन्म 11 जानेवारी 1944 रोजी झारखंडमधील धनबाद जिल्ह्यात झाला. बालवयातच त्यांच्या वडिलांचा सावकारांच्या अन्यायामुळे मृत्यू झाला आणि त्याच घटनेने त्यांच्या मनात अन्यायाविरोधात विद्रोहाची ठिणगी पेटवली. त्यांनी शेती सोडून आदिवासी हक्कासाठी आंदोलनांचा मार्ग निवडला.

**संघर्षातून उभारलेले नेतृत्व :-** शिबू सोरेन यांनी 1970 च्या दशकात 'संथाल परगना' भागात शोषणाच्या विरोधात मोठे जनआंदोलन उभारले. त्यांनी सावकारांविरोधात 'संजोग' (सावकार-विरोधी चळवळ) राबवली. 'झारखंड मुक्ती मोर्चा' (JMM) या पक्षाची स्थापना त्यांनी 1972 मध्ये केली आणि झारखंड राज्याच्या निर्मितीचा संघर्ष सुरु केला. त्या काळात शिबू सोरेन हे आदिवासी समाजाचे प्रखर नेते म्हणून उभे राहिले.

**राजकीय वाटचाल :-** शिबू सोरेन यांनी भारतीय संसदेतील अनेक टर्म्समध्ये खासदार म्हणून काम पाहिले. ते केंद्रीय कोळसा मंत्री झाले, परंतु त्यांच्या राजकीय आयुष्यावर काही काळ वादळही आले. चिरूडीह हत्याकांड, झारखंड खरेदी प्रकरण आणि इतर काही आरोपांनी त्यांची प्रतिमा डागाळली, पण शेवटी बहुतांश आरोपांतून ते निर्दोष ठरले. त्यांचे पुत्र हेमंत सोरेन यांनी त्यांच्या विचारधारेचा वारसा पुढे नेला आहे.

**झारखंडचे मुख्यमंत्री :-** शिबू सोरेन तीन वेळा झारखंडचे मुख्यमंत्री झाले. त्यांनी गरीब, शेतकरी, आदिवासी, दलित यांच्यासाठी कल्याणकारी योजना राबविल्या. त्यांनी आदिवासींच्या हक्कांकरिता विशेष कायदे लागू करण्यासाठी केंद्रावर सतत दबाव ठेवला. शिक्षण, आरोग्य, रोजगार आणि वनाधिकार हक्क या मुद्द्यांवर त्यांनी झारखंडात कार्य केले.

**समाजकारण, नाही तर सत्ताकारण? :-** शिबू सोरेन यांच्यावर टीकाही झाली. अनेकांनी त्यांच्यावर सत्तेसाठी मूल्यांशी तडजोड केल्याचा आरोप केला. काही वेळा त्यांनी भाजपशीही युती केली, तर कधी काँग्रेसशी. पण हे राजकारणाच्या अपरिहार्यतेतून केले गेले, की हेतुपुरस्सर? याचा विचार करताना त्यांच्या दीर्घकालीन संघर्षाचा विसर पडता कामा नये.

**आदिवासी स्वाभिमानाचा झेंडा :-** आजच्या राजकारणात जेव्हा व्यक्तिकेंद्री सत्ता, कार्पोरेटधार्जिणे धोरणे आणि आदिवासींच्या हक्कांवर गदा येत आहे, तेव्हा शिबू सोरेन यांचे जीवन आदर्श ठरू शकते. संघर्षाशिवाय सत्ता आणि हक्कांशिवाय विकास हा त्यांचा मूलमंत्र होता. शिबू सोरेन यांचे जीवन सांगते की, लोकशाही ही केवळ बहुमताची नाही, तर समूहाच्या हक्कांसाठी लढण्याची व्यवस्था आहे. झारखंडच्या मातीतील माणूस शिबू सोरेन हा संघर्षाचा शिल्पकार आहे, जो विस्मरणात गेला तरी त्याचे विचार झारखंडच्या जंगलात, जनतेच्या लढ्यात आणि भविष्याच्या हुंकारात जिवंत राहतील. ■ ■

**- प्रा. संध्या राजुरकर**
**निवासी संपादक**

बहुजन सौरभ

# धम्मपद म्हणजे सत्याचा खजिना




'धम्मपद' हा जागतिक वाङ्मयातील एक अद्वितीय ग्रंथ आहे. आकाराने लहान पण विचारांनी महान. इस्लाम म्हटले की कुराण. ईसाई म्हटले की बायबल आणि हिंदू म्हटले की गीता आठवावी, त्याप्रमाणे बौद्ध धम्म म्हटले की धम्मपदाचा ग्रंथ मनामध्ये दरवळायला लागतो. धम्मपद हा मूल्याचा महासागर आहे. धम्मपदातून बुद्ध धम्माच्या तत्त्वाचे झळकतांना दिसतो. सुंदर आणि मौलिक विचारांचे माणिकमोती या महासागरात आहेत. अज्ञान आणि अंधश्रद्धेचा अंधार दूर करणारा आणि मानवी जीवनाचा प्रवास उजळून टाकणारा धम्मपद हा एक महासुर्य आहे आणि त्यातील एक एक गाथा म्हणजे त्या महासूर्याची एक एक किरण आहे. भगवान बुद्धांनी 45 वर्षे भोजनाच्या हितासाठी आणि बहुजनाच्या सुखासाठी उपदेश केला. हा सर्वोपदेश ज्याच्यामध्ये आहे. तो महत्त्वपूर्ण ग्रंथ म्हणजे त्रिपिटक होय. 1) विनय पिटक, 2) सुत्तपिटक आणि 3) अभिधम्मपिटक. आचार्य बुद्धघोषाने त्रिपिटकातील अन्य ग्रंथाच्या आधारे 'धम्मपद अट्ठकथा' नामक ग्रंथ सिंहली भाषेत केला होता, त्याचा पाली अनुवाद 'भदंत बुद्धघोष महास्थवीर' यांनी केला, अशी माहिती संस्कृती कोशात वाचायला मिळते. या ग्रंथात पालीतून हिंदी अनुवाद स्वामी द्वारीकादास शास्त्री यांनी चार खंडांमध्ये प्रकाशित केला आहे. भदंत वेरागुडा सारद महाथेरो यांनी 'सत्याचा खजाना' हे शीर्षक देऊन धम्मपद इंग्रजीतून साकार केला आहे. 900 च्या वर पृष्ठ संख्या असलेला हा महाग्रंथ तायवांन वरून प्रकाशित झाला होता, याचाही रचना बुद्ध घोषाच्या अट्ठकथेप्रमाणेच आहे.

बुद्धांनी गाथा कोणाला उद्देशून म्हटली व तिचा अर्थ काय, त्याचे स्पष्टीकरण करून त्याचा भावार्थ काय हे सांगीतले. धम्माचा अर्थ समजून घेऊन त्याप्रमाणे आचरण करणे आणि वाचकाच्या मनात गाथेच्या अर्थाचा गंध दरवळत राहावा आणि धम्मानुभूतीने प्रेरित होऊन त्यांनी धम्म ही जीवन जगण्याची कला आत्मसात करावी, अशी सम्यक सद्भावना या ग्रंथात आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी बौद्धधम्म स्वीकारण्याचे 1950 साली निश्चित केल्यानंतर धम्माच्या भविष्याबाबत व त्याच्या प्रचार व प्रसाराबाबत अधिकाधिक खोलात जाऊन चिंतन मनन आरंभिले. त्यात त्यांनी प्रथम तीन गोष्टींना प्राधान्य द्यायचे ठरविले :- 1) बुद्ध-धम्माचा एक बायबलसारखा ग्रंथ तयार करणे, 2) भिक्षू संघाचे संघटन, त्याचे ध्येय व उद्दिष्टामध्ये परिवर्तन घडवून आणणे, 3) एक विश्व बौद्ध मिशन स्थापित करणे.

डॉ. बाबासाहेबांनी आपल्याला 'बुद्ध आणि त्यांचा धम्म' हा ग्रंथ लिहून एक धम्मग्रंथ दिला व पहिल्या गोष्टीची पूर्तता केली. परंतु बौद्ध वाङ्मय अति विशाल आहे.

**तथागताची सत्यगाथा**



देविदास राऊत
(बौद्धाचार्य)
मो. 8668238330

त्याला कोणाला धम्माचा सार जाणून घ्यायचा असेल त्यासाठी हा विशाल सागर पार करणे फार कठीण आहे, म्हणून त्यांनी बुद्धाच्या धम्माचे हिरे, माणिक, मोती निवडून तेवढेच आपल्या ग्रंथात ठेवले आणि धम्मपद मधल्या सरासरी सोळा गाथेच्या कथा डॉ. बाबासाहेबांनी देण्याचा प्रयत्न केलेला आहे. अन्यथा तो विशाल ग्रंथ झाला असता. आणि स्वतःजवळ बाळगणे सर्वसाधारण लोकांना कठीण गेले असते. धम्मपदामध्ये 423 गाथा आहेत. धम्मपद हा ग्रंथ सर्वाच्या जीवनात परिवर्तन घडवून सुख आणि शांती प्रदान करो, अज्ञान, अंधःकार दूर करून प्रज्ञाचा प्रकाश निर्माण हो. ज्या गाथा भगवंताच्या तोंडून ऐकून हजारोच्या जीवनात आनंदाची फुले फुलविली गेली, मनाचे किती सखोल चिंतन बुद्धाने केले होते हे लक्षात येते, अशा या मनाचे दोन विषयक बुद्धाने सांगितलेले आहे, एक म्हणजे मन पाहता येत नाही आणि दुसरे म्हणजे मन पकडता येत नाही. बुद्ध म्हणतात, चांगले कुशल कर्म कराल तर तुमचे कुशल होईल आणि अकुशल कर्म कराल तर तुमचे अकुशल झाल्याशिवाय राहणार नाही.

**क्रमशः ■ ■**

# गुडबाय बबनमामा....

रामभाऊ उपाख्य बबन नागोराव चिव्हाणे यांचे निधन झाल्याची दुःखद बातमी फोनवर आली आणि मनातल्यामनात कळवळलो. त्यांना मी मामा म्हणायचो. आमच्या वारा या खेडेगावाची ही संस्कृती. गावात जातीच्या पलिकडची ही नाती कशी निर्माण झाली असेल? हा तसा संशोधनाचा विषय म्हणता येईल. पण अशी नाती गावात होती. जाती असल्या तरी संकटात सारा गाव एकमेकांच्या मदतीला धावून जायचा. गावात कुणी उपाशी राहणार नाही, याची काळजी घेतली जायची. लग्न असो वा मरण, गाव एकजूट व्हायचा. 1950-60 दशकाचा तो काळ होता. गावांत गरीब-श्रीमंत होते. पण त्यापलिकडची माणुसकी होती. नागोराव नारायण चिव्हाने, नारायण वाघूजी गोरे, शंकर वट्टी, उरकुडा कोतवाल, सुरेभान सिडाम, शामराव पाटील (गोरे) अशी नामवंत मंडळी गावगाडा चालवत. गावात दत्तक सावकार, सांबाशिव यमसनवार, पांढरकवडाचे पत्की कुटुंब यांचा ईजारा होता. बाकीच्या लोकांकडे छोटी-मोठी शेती होती. मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांचा तो काळ होता. गांवात पंचायतराज व्यवस्था आली होती. मग ग्रामपंचायत आली. सरपंच पदासाठी चढाओढ सुरु झाली. गावातले गांवपण हळू हळू संपायला लागले. सांबाशिव यमसनवार सावकाराने गावातला वाडा शेतात हलविण्याचा निर्णय घेतला. त्यांच्याकडे गुरेढोरे आणि गडीमाणसांचा खूपमोठा पसारा होता. फकरुमामा लोहकरे यांच्याकडे दत्तक सावकाराचे आवारपण होते. फकरुमामा माझ्या बाचा वर्गमित्र होता. त्या काळात ते मराठी चौथी झाले होते. त्यांना विडीचा शौक होता. टीबी झाला. त्यात त्यांचा मृत्यू झाला. त्यांच्या अकस्मात निधनाने कुटुंबावर मोठा आघात झाला. त्यावेळी दत्तक सावकाराने मदतीचा हात दिला. गुणवंतच्या शिक्षणाची जबाबदारी यमसनवार सावकाराने स्वीकारली व ती पूर्ण केली. सावकाराचा हा बंडा आमच्या गावाची शान होती. तो गायीगुरे आणि गडीमाणसांनी भरलेला असे. या बंड्यासमोर मोठे पाकळीचे झाड होते. त्या झाडाखाली बापुराव वाढ्याचा (सुतार) कामटा होता. येथे रोज ते लाकडी शेती अवजारांची कामे करीत. रिकामटेकड्या लोकांची येथे बैठक भरायची. चिलीम चुट्टा ओढत (पित) बसायचे. वांजरीचा बळी बैरागी याच झाडाखाली बिराड थाटायचा. पहाटे टापर वाजवत भीक मागायचा व रामायण महाभारतच्या कथा तंबोराच्या तालावर रंगवून सांगायचा. बबन मामा आपल्या जाण्याने मनात अशा खूप आठवणी दाटून आल्याने त्याला मोकळीक दिली. आपणास विनम्र अभिवादन! चिव्हाणे कुटुंबीयांवर ओढवलेल्या दुःखात मी सहभागी आहे. ■ ■






जयंत नरांजे
मो. 9423634829

# ठेंभुर्णीचा शहीद पोचिराम कांबळे

मराठवाड्यातील नांदेड पासून दूर अंतरावर असलेले ठेंभुर्णी गाव दि 4-8-1978 ज्याने भविष्यात जन्म घेणाऱ्या सच्चा आंबेडकरी अनुयायांच्या काळजालाच हात घातला होता. जगाच्या इतिहासात खऱ्या आंबेडकर अनुयांची ओळख सांगणारा असा हा जगावेगळा वर्तमान काळातील विरळा दाखला...! आजपर्यंत ऐसा दाखला ऐकलाच नव्हता व मी पाहिलाच नव्हता.

मराठवाड्यात पेटलेला नामांतर वनवा अजून शांत झाला नव्हता. या वनव्याने आपला मोर्चा ठेंभुर्णी गावाकडे वळविला होता. ठेंभुर्णी गावांतील मातंग व बौद्ध समाजातील लोक गुण्या गोविंदाने एका जीवाने राहत होते. याचे कारण होते शिक्षण व डॉ. आंबेडकर विचाराची धारणा. पुरेसे सुशिक्षित झाल्याने त्यांना त्याचे चांगले राहणीमान आले. आता दलित चिरेबंदी वाड्यात राहू लागले होते. मान ताठ करून जगायला लागले होते. ते आता जोहार माय बाप करायला व म्हारकी करावयास उपलब्ध नव्हते, तर आता स्वतःच्या पायावर भक्कमपणे उभे होते आणि हेच सवर्ण लोकांच्या डोळ्यात सलत होते, खुपत होते. यातून सुदाचा प्रवास सुरु झाला व सवर्ण वर्ग संधीचीच वाट पाहू लागला. त्यांना दलितांचे नाक ठेचण्यासाठी मोका हवा होता. तो मोका, ती संधी मराठवाड्यात विद्यापीठाच्या निमित्ताने आयती चालून आली. दि. 4-8-1978 उलट्या काळजाच्या समाजकंटक म्होरक्याची बैठक झाली, आदल्यादिवशी कट शिजला. दलितांना त्याच्या घरा-दारासकट नेस्तनाबूत करण्याचे ठरले. त्यासाठी त्यांनी टार्गेट ठेवले स्थानिक सुशिक्षित नेत्याचे. त्यात पहिला क्रमांक लावण्यात आला मातंग समाजाच्या आयु. पोचिराम मरीबा कांबळे याचा, त्याच्या नातेवाईक व सहकार्याचा. दलित वस्ती सवर्ण गावगुंडामार्फत उद्ध्वस्थ व बेचिराख केली जाणार आहे हि कुण कुण दलितांना लागल्याने दलित तरुण रात्रीच्या अंधारात आपला जीव मुठीत घेऊन गावातून आधीच पळाले. रात्री या बाबतची गुप्त खबर दलित वस्तीस दिली व वस्तीस सावध केले होते. वस्तीच्या सुरक्षिततेच्या ध्यासाने पोचिराम कांबळे रात्रभर पडवीत तळमळत होता. पोलिसात तक्रार करूनही पोलिसांचे स्वरक्षण अजूनही पोहचले नव्हते. कुशी बदलत असताना दोन व्यक्ती पहाटेच्या अंधारात पडवीत आल्या. 'तुझ्यावर घाला घातला जाणार आहे. लवकर घरातून निघ, आम्ही तुला वाचविण्यासाठी आलो आहोत सोबत चल!' त्यांचे कपट कारस्थान ध्यान्यात न आल्याने पोचिराम कांबळे पहाटेच्या अंधारात या दोघांबरोबर मोठ्या विश्वासाने घराबाहेर पडला.

पहाटेची सूर्याची किरणे ठेंभुर्णीच्या वेशीत प्रवेश करीत होती. रात्रभर अंधारात दबा धरून बसलेल्या दोनशे-तीनशे सवर्ण लांडग्याची हातात कुऱ्हाड, पहारी, लाठ्या-काठ्या आणि हातात कोरोसिनचे डबे घेऊन दलित वस्तीवर हल्ला केला.महार शरद पवार मुर्दाबाद, जय भिम! शरद पवार मुर्दाबाद, शरद पवार शरद पवार हे अशा व अनेक विभत्स घोषणा देत हे रानटी पशु दलित वस्तीवर तुटून पडले. प्रथम त्यांनी शंकर देवबा कांबळे यांच्या दगडी चिरेबंदी वाड्यास खडक फोडण्याचा सुरुंग लावला व दगडी चिरेबंदी वाडा स्फोटाने जमीनदोस्त केला.

लचके तोडण्यासाठी आलेल्या लांडग्यानी पोचिराम कांबळे याचा शोध घेण्यास सुरवात केली. पोचिराम - वस्तीतून पळून गेल्याचे समजताच पिसाळलेला जनसमुदाय पोचिराम कांबळे पळाल्याच्या दिशेने धावत सुटला. शेवटी त्यांनी पोचिरामला राऊत खेडा गावच्या वेशीत गाठले. शंभर कुत्र्यांनी एखाद्या जखमी वाघावर वर्मावर हल्ला करावा तसा हल्ला पोचिराम कांबळे वर करण्यात आला. त्याला जमिनीवर लोळविण्यात आले असावे व त्याच्या छाताडावर लाठ्या काठ्याच्या वार करून विचारण्यात आले 'बोल जयभिम बोलशील का? बोल आंबेडकर जयंती गावात करशील काय?' श्री पोचिराम मरीबा कांबळेचे उत्तर होते, 'होय! मी जय भिम बोलेन जयंती करेन' उत्तराने चिडलेला सवर्ण भ्याड हल्ले खोरणांनी तिष्ण शस्त्रांनी चिलकांद्या उडत होत्या आणि वर्मी बसलेल्या प्रत्येक वारा गणिक पोचिराम कांबळे म्हणत होता जयभिम जयभिम!!




शेवटच्या श्वासापर्यंत मी जयभिम जयभिम म्हणेन. शेवटी पोचिराम त्याच्या जीवाचे दान देण्याचे आमिष दाखविण्यात आले. जयभिम म्हणावयाचे सोड. आम्ही तुला तुझ्या जीवाचे दान देतो. तुला अजूनही जिवंत सोडतो. श्री. पोचिराम कांबळेने मरण पत्कारले. जिवाच्या भीतीने जयभिम नावाशी त्याने तोडजोड केली नाही. अनेक वर्मी घाव बसल्याने रक्तबंबाळ झालेल्या श्री. पोचिराम कांबळे या आंबेडकर अनुयायांचा देह तोडलेल्या केळीच्या खेडासारखा धरणीवर उन्मळून पडला. महाकाय या गावाच्या शिवारातील विहिरीवरील लाकडी बगाडाची लाकडे उखडून काढण्यात आली व त्याचे सरण शिवारात रचण्यात आले. निर्जीव लाकडावर सजीव पोचिराम कांबळेचा देह ठेवण्यात आला व उगवत्या सूर्याच्या साक्षीने पेटविण्यात आला. पेटलेला लाकडावर पाण्याबाहेर काढलेल्या माश्यासारखा चितेवर पोचिराम कांबळेचा देह तडफडत होता व पेटलेल्या ज्वालाकडे पाहत मनू शक्ती खदखदून हसत होती. चितेच्या लपेटलेला ज्वालेतूनही पोचिराम कांबळे घोषणा देत होता. जयभिम जयभिम नामांतर झालेच पाहिजे. पोचिराम कांबळेच्या पत्नीचे कुंकू पुसून त्याच्या भवानी आईने आपल्या कपाळी दलितांच्या रक्ताचा मळवट भरला, जय भवानी जय भवानी!

पोचिराम तुला डॉ. बाबासाहेबांचा निळा सलाम! दलितांचा संघर्षाचा इतिहास तुझे नाव आदराने घेईल. इतिहासाच्या मुख पृष्ठावर सुवर्ण अक्षराने तुझे नाव कोरले जाईल. विधवा उध्वस्त झालेल्या धोडाबाई पोचिराम कांबळे व दलित गावकऱ्यांनी आपल्या छातीवर धोंडा ठेवून मनूच्या छाताडावर निळा झेंडा रोवून नामांतर विरोधकांना सांगितले 'आता नामांतर झालेच पाहिजे; आता नामांतर होणारच.' ज्या भगिनींचा चंदर मुलगा कापला गेला, ज्या भगिनीचे कपाळावरचे कुंकू पुसले. गळ्यातले मंगळसूत्र तुटले, ज्या वृद्ध बापाचा पोरगा जनावरसारखे कापला गेला, ते डोळ्यांनी त्याने पाहिले, त्यांनी आपले सर्वस्व उध्वस्त झालेले असतांनाही सांगितले. नामांतराची किंमत आमच्या रक्ताने दिली आहे. आता नामांतरापासून माघार नाही. सलाम निळा अशा बापाला. निळा सलाम या माउलीला. भगिनीला व गावाला....! ज्यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर बापासाठी तन मन धन गमावले....

म्हणूनच कविवर्य सुरेश भटांनी कविता लिहिली...!

*जाळलो गेलो तरी सोडले नाही तुला...!*
*कापलो गेलो तरी तोडले नाही तुला...!*
*ही तुला उद्ध्वस्त झालेला घरांची वंदना...!*
*भीमराय घे तुला या लेकरांची वंदना....!*
*नामांतर लढ्यातील शहीद पोचीराम कांबळेच्या हत्यारे जातीयवाद्यांचा बदला घेणाऱ्या पोचीराम यांचा मुलगा चंदर कांबळेंचा आज 'हुतात्मा दिन' आहे. शहीद चंदरच्या बलिदानाला, त्यागाला विनम्र अभिवादन!*

पोचिराम कांबळे यांचा हुतात्मा दिवस 6 ऑगस्ट 1987 हा आहे. ■ ■

“ प्रश्न विचारणे ही ज्ञानाच्या शोधाची पहिली पायरी आहे. ”



### आ. राजकुमार बडोले यांचे खासदार, आमदारांना खुले पत्र

# अनुसुचित जातींचे बौध्द धर्मांतर आणि वर्तमान..... !

*भारतीय समाजव्यवस्था म्हणजे जातीचा समुह होय. या समुहात हजारो जाती येतात. त्या आपल्याच समुहात आंतरजातीय विवाह करतात. त्यांची ही परंपरा हजारो वर्षाची आहे. दुसरा जो समुदाय आहे. तो हजारो वर्षापासून जंगलात राहत आला. तो आपली संस्कृती, चालीरिती, परंपरा जपतो. तो आपल्या समुहातच लग्न करतो. तो आदिवासी समाज होय. संविधानीक भाषेत अनुसूचित जमाती असे म्हणतात. या अनुसूचित जाती-जमाती अन्य समुदायांपासून भिन्न आहेत.*

भारतीय समाजात चातुवर्ण्य व्यवस्था होती.तेव्हा ब्राम्हण, क्षत्रीय, वैश्य, आणि शुद्र असे चार वर्ण होते. त्यानुसार समाज विभागणी होती. याशिवाय एक पांचवा अतिशुद्र असा गट निर्माण झाला. त्याची धर्मग्रंथात नोंद नाही. तीन वर्णांच्या व्यवहारातून शुद्राच्या गटात एक नवा गट निर्माण झाला. समाज सुधारकांनी त्याचे अतिशुद्र असे नामकरण केले. हा गट हजारो वर्षांपासून नरकयातना भोगत आला. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी या गटात स्वाभिमान जागविला. त्याला सन्मानाने जगण्याची नवी दिशा दिली. त्याला संविधानाच्या माध्यमातून सामजिक, आर्थिक, शैक्षणिक आरक्षण मिळवून दिले. तर शुद्र वर्गाला संविधानीक भाषेत इतर मागासवर्ग (ओबीसी) म्हटले गेले. त्यांना भारतीय संविधानाच्या परिच्छेद 341 अन्वये आरक्षण व अन्य अधिकार मिळाले. अनुच्छेद 342 अन्वये अतिशुद्र वर्गाला (अनुसूचित जाती) आणि 343 अन्वये अनुसुचित जमातीला आरक्षण मिळाले.

हिंदु धर्म व्यवस्थेने सन्मानाने जगण्याचा, संपत्ती बाळगण्याचा अधिकार नाकारला होता. संविधान लागू झाल्यावर त्यांना सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक अधिकार मिळाले. तरी धर्मव्यवस्था जातीय घडी मोडायला तयार नव्हती. त्यावर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी कडू औषध शोधले. 14 ऑक्टोबर 1956 ला नागपूरच्या दीक्षाभूमीवर स्वतः बौध्द धम्म स्वीकारला. सोबत अनुसूचित जातींच्या लोकांना धम्मदीक्षा दिली. बौध्द धम्म प्रज्ञा, शांती, सत्य आणि करुणेचा आचरणाचा मार्ग आहे. ज्यात चातुवर्ण्य व्यवस्थेला अजिबात थारा नाही. ‘आरक्षणाची तरतूद आणि धर्मातंरित बौध्दांचे प्रश्न’.

26 जानेवारी 1950 ला भारतीय संविधान लागू झाले. त्यानूसार देशभरातील अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती व ओबीसी समाजाला शैक्षणिक आणि सामाजिक आरक्षण लागू झाले. त्यासाठी भारत सरकारचा 20 ऑगस्ट 1950 चा गॅझेट समजून घ्यावा लागेल. त्याला संवैधानीक आर्डर (अनुसुचित जाती) म्हणतात. तो तत्कालिन भारताच्या राष्ट्रपतींनी 1950 रोजी जारी केला. त्यात म्हटले आहे की, ‘जाती, वर्ण, किंवा जमाती किंवा जातींचा समुह जो भाग ते 1 ते 16 मध्ये अनु.जातीच्या यादीत आहे. राज्यात किंवा केंद्रशासीत प्रदेशात समाविष्ट आहे. त्याला अनु. जातीचा म्हणून संबोधले जाईल. हिन्दु धर्मातील अतिशुद्र जाती आणि शीख धर्मातील रामदासी, कबीरपंथी, मझहबी किंवा सिकळीगर जाती ज्या पंजाब, पटीयाला आणि पुर्व पंजाबातील केंद्रशासीत प्रदेशात आहेत. त्यांचा अनुसुचित जातींमध्ये समावेश करण्यात आला. 11



ऑगस्ट 1950 ला दुसरा संवैधानीक आर्डर महामहीम राष्ट्रपतीच्या स्वाक्षरीने जारी करण्यात आला. पहिला अनुसूचित जाती आर्डर 1950 व दुसरा आर्टीकल 342 अंतर्गत अनुसूचित जमातींचा आहे. यात अनुक्रमे राज्यनिहाय अनुसूचित जाती व अनुसूचित जमातींची यादी जाहीर झाली. यासोबत त्यांचे जात प्रमाण पत्र तयार करण्याबाबत फार्म जोडण्यात आले.

**आदिवासींचा धर्म नाही...!**

आदिवासी जमाती हया कोणत्याही धर्माचा भाग नाहीत? जगभर त्यांची एक नैसर्गीक संस्कृती आहे. ते त्याची वेगळी संस्कृती आणि पंरपरा जपत आलेत. त्यांचा कोणत्याही धर्म संवैधानीक आर्डर अनु.जमाती 1950 मध्ये नाही. परंतू अनु.जातीच्या बाबतीत मात्र हिंदु धर्मातील अस्पृश्य जातींचा समावेश या संवैधानीक शेडयुलमध्ये करण्यात आला आहे. अनुच्छेद 341 हे धार्मिक दृष्टया भेदविरहीत आहे. कोणतीही अस्पृश्य जाती मग ती कोणत्याही धर्मातील का असेना राष्ट्रपती त्यांना अनुसुचित जातीत समाविष्ठ करु शकतात. 1956 मध्ये संवैधानीक सुधारणा करण्यात आली आणि शिख धर्मातील अनेक अनु.जातीना पंजाब राज्यात आणि केंद्रात आरक्षण देण्यात आले. त्यामुळे हिंदू आणि शिख धर्मातील अनु. जातींना पंजाब राज्यात आणि केंद्रात आरक्षणाची सवलत मिळाली.

14 ऑक्टोबर 1956 ला डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी बौध्द धर्माची दिक्षा घेतली. त्यांच्या सोबत पांच लाखांपेक्षा जास्त महार, मातंग, व इतर अनुसूचित जातींचे लोक धर्मातंरीत झाले. ते पुर्वाश्रमीचे महार, मातंग, ढोर, हे आरक्षाणाचे लाभार्थी हाते. ते बौध्द झाल्यामुळे आरक्षाणापासून वंचीत झाले. महाराष्ट्र सरकारने 1960 मध्ये कायदा केला आणि या धर्मांतरीत नवबौध्दांना महाराष्ट्र राज्यात आरक्षणाचा लाभ जाहीर केला. 1962 मध्ये जातीचे प्रमाणपत्र फार्मेट त्यांच्या सोयीप्रमाणे जारी करण्यात आले. त्यामुळे महाराष्ट्रातील धर्मातरींत बौध्दांना आरक्षणाचा लाभ राज्यात मिळू लागला. परंतू केंद्र सरकारने 1990 पर्यंत या धर्मांतरींत बौध्दांना केंद्रात आरक्षणाचा कोणताही लाभ दिला नाही.

1990 मध्ये केंद्र सरकारने घटनादुरुस्ती केली. 1950 च्या राष्ट्रपती आर्डर मध्ये हिंदू, शीख याच्यासोबत बौध्द धम्माचा समावेश करण्याचा कायदा पारीत झाला. 341 आणि 342 अंतर्गत अनुक्रमे जाती आणि जमाती समुहाची मान्यता आहे. त्यात धर्मांचा समावेश करता येणार नाही. असे काही सरकारी अधिकारी म्हणतात. परंतू संवैधानीक अनुच्छेद 341 मध्ये अशी कोणतीही बंधने नाहीत.

1990 च्या संविधान संशोधनानंतर धर्मांतरीत नवबौध्दांना जात प्रमाण पत्र वितरीत करतांना 1956 च्या पुर्वीची जात नमुद करुन 1956 नंतर धर्मांतरीत झालेला धर्म बौध्द म्हणून नमूद करुन ‘जात प्रमाणपत्र’ देता येते. कारण संविधानात 341 अ.जा.नुसार ही सोय आहे.

1. राष्ट्रपती कोणत्याही राज्याच्या किंवा केंद्रशासीत प्रदेशाच्या संदर्भात आणि जेथील ते रहिवासी असतील तेथे राज्यपालांशी सल्लामसलत केल्यांनतर सार्वजनिक अधिसुचनेद्वारे या संविधानाच्या उद्देशासाठी त्या राज्याच्या किंवा केंद्रशासीत प्रदेशांच्या संदर्भात अ.जा. म्हणून मानल्या जाणाऱ्या जाती वंश, जमाती किंवा जाती, वंश किंवा जमाती मधील भाग किंवा गट निर्दीष्ट करु शकतात.

2. **संसद कायद्याद्वारे कलम** 1) अंतर्गत जारी केलेल्या अधिसुचनेत निर्दीष्ट केलेल्या अनुसूचित जातींच्या यादीत कोणत्याही जाती वंश किंवा जमातीच्या भाग किवा गट समाविष्ट करु शकते किंवा वगळू शकते. परंतू न वगळता वर सांगितल्या प्रमाणे सदर कलमांअंतर्गत जारी अधिसुचनेत त्यांनतर कोणत्याही अधिसुचनेद्वारे बदल केला जाणार नाही. वरील प्रमाणे कलम 341 अनु.जाती मध्ये तरतूद असतांना आणि 1990 मध्ये घटनादुरुस्ती झाली असतांना धर्मांतरीत बौध्दांना साधा दाखला मिळत नाही. केंद्र सरकारच्या आरक्षणाच्या तरतुदी लागु होत नाहीत. हे अत्यंत दुर्देवी आहे. याबाबत केंद्र सरकारच्या सामाजिक न्याय विभागातील मंत्री महोदयांशी मी महाराष्ट्राचा सामाजिक न्याय मंत्री असतांना 2016 व 2017 मध्ये दोन वेळा बैठका घेतल्या होत्या. परंतू केंद्र सरकारमधील काही सचिव 1950 मध्ये जारी करण्यात आलेला ‘जाती प्रमाणपत्राचा नमुना’ बदलवण्यास तयार नाहीत. त्यामुळे 20 नोव्हेंबर 1990 मध्ये घटनादुरुस्ती होऊनही त्याचा उपयोग होत नाही. विशेष म्हणजे केंद्र सरकारच्या जाती प्रमाणपत्राच्या नमुन्यात 1950 ची अनु.जाती आर्डर, 1950 ची केंद्रशासीत प्रदेश आर्डर, 1960 ची मुंबई कायदा, 1966 चा पंजाब कायदा, 1970 चा हिमाचल प्रदेश कायदा, 1971 चा उत्तर पुर्वेतील क्षेत्रीय कायदा, 1976 चा अनुसूचित जमाती सुधारणा कायदा, 1956 व 1989 चा जम्मु कश्मीर अनु. जाती व जमाती सुधारणा कायदा, यासोबत अनेक केंद्रशासीत प्रदेशांनी वेळावेळी केलेले अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती सुधारणा कायदे समाविष्ट करण्यात आले आहेत. परंतू 1990 चा कायदा समाविष्ट करण्यात आला नाही.

याबाबद केंद्रीय सचिवांनी महाराष्ट्र शासनाच्या 21 एप्रिल 2017 च्या पत्राच्या अनुषंगाने 17 नोव्हेंबर 2017 जे पत्र लिहीले होते की विधी व न्याय विभागाकडून योग्य तपासणी करुन महाराष्ट्र सरकारने धर्मातंरीत बौध्दांसाठी दिलेल्या अनु.जातीच्या प्रमाण पत्राची पूर्ण तपासणी केली असता ते प्रमाणपत्र 20 नोव्हेंबर 1990 च्या केंद्र सरकारच्या प्रमाण पत्राशी सुसंगत नाही म्हणून ते लागु करता येणार नाही असे लिहीले होते. मुळात एखादा केंद्र सरकारमधला सचिव पत्र लिहितो. परंतू केंद्रातील मंत्री त्यावर बोलत नाही किंवा संसदेत चर्चा होत नाही. हेच दुदैवी आहे.

1990 मध्ये धर्मातंरीत बौध्दासाठी घटनादुरुस्ती करुनही हिन्दु व शिखाप्रमाणे बौध्दांना कायद्याने मान्यता देऊनही सरकार जर योग्य कार्यवाही करीत नसेल तर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या घटने प्रमाणे निवडून आलेल्या आमदार, खासदारांनी आणि न्याय प्रणालीतील जेष्ठ अधिवक्तांनी त्यासाठी पुढे येणे गरजेचे आहे. 2026 मध्ये देशाची जणगणना सुरु होत आहे तेव्हा या धर्मातंरीत नवबौध्दांनी जातीच्या कालम मध्ये नवबौध्द, बौध्द लिहायचे कि पुर्वापार चिकटलेली जात लिहायची हा प्रश्न आहे.

त्यांनी बौध्द लिहिले तर त्यांची गणना अल्पसंख्याक म्हणून केली जाईल. तेव्हा राज्य सरकारने आणि 1990 मध्ये व्ही. पी. सिंग सरकारने दिलेल्या आरक्षणाची पायमल्ली होईल. त्यासाठी सगळ्यांनी एकत्र येऊन लढणे गरजेचे आहे. ■■

**– आ. राजकुमार बडोले**
माजी सामाजिक न्यायमंत्री

---

# मैत्री चे नाते खऱ्या अर्थाने समजून घेत

जेव्हा संकट काळात सोबत असणारा तोच मित्र खरा आणि तेच मैत्रीचे नाते होय. तुम्ही त्यात आहे अथवा नाही हे ज्याचे त्याने ठरवावे लागेल. तेव्हा मैत्री दिना निमित्ताने आम्ही काही वास्तव समजून घेण्याचा प्रयत्न केला पाहिजे. खरे तर 1848 सालात जीवापाड प्रेम करणारा असा मित्र झाला आहे की ज्याची इतिहासात नोंद घ्यावी लागली. तो मित्र म्हणजे जात, पात धर्म आणि पंथ याही पलीकडे जाऊन खऱ्या अर्थाने मैत्री निभावणारा होता. आपल्या जर लक्षात असेल तर 1848 साली सावित्रीबाई फुले यांना महात्मा जोतिबा फुले यांनी मुलींना शिक्षण देण्यासाठी प्रोत्साहन देऊन शाळा काढली होती. ती भिडे वाड्यात शाळा सुरु केल्यानंतर सावित्रीबाई फुले नियमित मुलींना शिकवायला जात होत्या ही बाब काही सवर्ण म्हणजे ज्यांच्या डोक्यात केवळ उच नीच भावना आहे, जात आहे, जातीयता आहे यांच्या नजरेस पडली. त्यांनी सावित्रीबाईला शिकविन्यापासून परावृत्त करण्याचा प्रयत्न केला. महात्मा फुलेला पण कदाचित समजविण्याचा प्रयत्न केला असेल. पण ती दोघेही समजून घेण्यासाठी तयार नव्हते. त्यामुळे त्यांनी आपला मोर्चा जोतिबा फुलेचे वडील गोविंदराव फुले यांच्या वाड्याकडे वळविला. त्यांनी गोविंदराव फुले यांना समजावून सांगितले की, तुमची सून ही भिडे वाड्यात जाऊन मुलींना शिक्षण देत आहे. तिच्या अशा वागण्यामुळे धर्माला ग्लानी येते. त्या काळात महिला शिकणे हे अगदी दुरापास्त होते. ती मुलींना शिकविते त्यामुळे धर्म बुडेल. म्हणून आपण तिला मुलींना शिकविण्यापासून रोखले पाहिजे, नाहीतर आम्हाला आमच्या पद्धतीने कार्य करावे लागेल अशी दमदाटी दिली. ही बाब महात्मा जोतिबा फुले घरी आल्यानंतर गोविंदा फुले यांनी आपल्या पत्नीला म्हणजे सावित्रीबाई फुले यांना मुलींना शिक्षण देण्यासाठी जोतिबा तू उद्या पासून पाठवू नको असे सांगितले. सावित्रीबाई फुले त्या घरी आल्या होत्या, दोघांच्याही समोर गोविंदा फुले बोलले. जोतिबा थोड्या वेळ शांत राहिले आणि म्हणाले आपण तर मुलींना शिक्षण देत आहोत. म्हणजे सावित्रीबाई काय चुकीचे करीत आहे? असा प्रश्न केला असता, गोविंदराव फुले यांनी मोठ्या आवाजात जोतिबाला सांगितले, तू तिला उद्यापासून मुलींना शिकवायला पाठवू नको? तत्पूर्वी काही सवर्ण जातीवादी ब्राम्हण यांनी गोविंदा फुलेला सांगितले होते की जर सावित्रीबाई फुले यांनी शिकविणे बंद केले नाही तर मात्र आम्ही तुमच्या कुटुंबातील लोकांवर धर्म बुडवीला म्हणून बहिष्कार टाकू, त्यावेळी तुम्हाला होणाऱ्या परिणामाला सामोरे जावे लागेल. बहिष्कार जर आपल्या कुटूंबातील लोकांवर टाकला गेला तर आपल्याला खूप त्रास होईल याची जाणीव गोविंदराव फुले यांना होती. या सर्व कारणाने गोविंदा फुले कोणतीही रिक्स घ्यायला तयार नव्हते. त्या काळात प्रचंड मोठ्या प्रमाणात जातीयता होती. त्यामुळे आपण जर सावित्रीबाई फुलेला मुलींना शिकविन्यापासून रोखले नाहीतर भविष्यात आपल्या कुटुंबाला त्रास होईल ही जाणीव असल्याने गोविंदा फुले जोतिबाला म्हणाले जर तू शिकविणे बंद करायला सावित्रीस सांगितले नाही, तर माझ्या घरातून आताच्या आता निघून जा, अशी दमदाटी दिली. त्या काळात महिलांना घराबाहेर हाकलने योग्य नव्हते. त्यामुळे गोविंदा फुले यांनी सावित्रीबाई फुले यांना फारसे बोलणे टाळले. सावित्रीबाई फुलेसमोर धर्मसंकट निर्माण झाले. जोतिबा फुले घराच्या बाहेर पडायला तयार होते, पण सावित्रीबाई फुलेंनी मुलींना शिकविणे बंद करावे या मताचे ते बिलकुल नव्हते.

सावित्रीबाई फुलेसमोर प्रश्न उभा राहिला की तिने घराबाहेर पडलेल्या जोतिबा सोबत जायचे, या सासरे गोविंदा फुले यांच्यासोबतच राहायचे, काय? निर्णय घ्यावा हे तिला समजत नव्हते. विचाराअंति तिने जोतिबा फुले सोबतच जाण्याचा निर्णय घेतला. सोबत कसल्याही प्रकारचे पाठबळ नाही, पैसा नाही, आपण नेमके कुठे जावे, कोणाला मदत मागावी या विचारात असतांना आणि बाजारमध्ये चिंताग्रस्त अवस्थेत फिरत असतांना, उस्मान शेख यांची नजर जोतिबा आणि सावित्रीबाई कडे गेली. जोतिबा हा उस्मान शेखचा मित्र होता. उस्मान शेख यांना जोतिबा खूपच चिंतेत असल्याचे जाणवले आणि त्यांनी जोतिबा आणि सावित्रीबाई फुले यांना विचारणा केली. त्यानी घडलेली खरीखुरी हकीकत सांगितली. तेव्हा जोतिबाचा मित्र उस्मान शेख म्हणाला, ‘कोई बात नही, बस इतनीशी बात है’ ! आप हमारे घर मे राहिये, और लडकियों को पढाईये, त्यांनी स्वतः जोतिबाला आणि सावित्रीबाई फुले यांना आपल्या घरी नेले. स्वतःची रूम दिली, भांडी कुंडी दिली आणि अनाज ही दिले आणि प्रचंड असा धीर दिला, आणि फातिमा शेख आपल्या बहिणीलापण शिकविले आणि मुलींना शिकविण्यास प्रोत्साहित केले. पुढे सावित्रीबाई फुले सतत मुलींना शिकवायला जाऊ लागल्या, फातिमा शेख या पण मुलींना शिकवू लागल्या. सावित्रीबाई फुले आणि फातिमा शेख यांनी मिळून पुढे 1848 ते 1851 पर्यंत अठरा शाळा काढल्यात. दोघांची मैत्री एवढी होती, की त्या मैत्रीची देशातील लोकांना नोंद घ्यावी लागली. त्याच्या मैत्रीमध्ये ना धर्म आड आला, ना जात आडवी आली. ही बाब समजून घेण्याची खऱ्या अर्थाने गरज आहे. सावित्रीबाई फुले आणि फातिमा शेख यांची गाढ मैत्री होती. अगदी तशीच मैत्री ही जोतिबा फुले आणि उस्मान शेख यांची होती. या मैत्रीने इतिहास तयार केला आहे. आज हिंदू मुस्लिम हे कसे आपसात भांडण करतील असले शब्द फेकणारे खूप दिसतील, मंदिर, मज्जीद यावरून कधी भांडणे होऊन परिस्थिती हाताबाहेर जाईल हे सांगता येत नाही. डॉ. बाबासाहेब आंबेडकर 17 डिसेंबर 1946 च्या संविधान सभेतील भाषणात म्हणतात की, आपल्या देशाला स्वातंत्र्य मिळणार आहे हे निश्चित झाले आहे. हे मिळणार असलेले स्वातंत्र्य चिरकाल कायम ठेवायचे असेल तर जात, पात, धर्म आणि पक्ष मतभेद बाजूला सारून भारतीय समाजातील लोकांच्या हितासाठी सुखासाठी आणि खऱ्या अर्थाने काम केले आणि संविधान तयार केले तर आपल्याला मिळणारे स्वातंत्र्य चिरकाल टिकणारे आहे, अन्यथा नाही असे स्पष्ट मत व्यक्त केले होते. आज देशात हिंदू मुस्लिम यांच्या बाबत सातत्याने होत असणारे वक्तव्य बघून भारतातील सामाजिक जाण असणाऱ्या माणसाच्या मनात चिंता उत्पन्न होऊ लागली आहे. तेव्हा भारतीय समाज बांधवानी खऱ्या अर्थाने समजून घेण्याची गरज आहे. जोतिबा फुले आणि उस्मान शेख यांची आणि सावित्रीबाई फुले आणि फातिमा शेख यांची मैत्री ही जात, पात, धर्म आणि पंथ यांच्या पलीकडील होती. त्यामुळे सर्व जाती, धर्माच्या मुलींना शिक्षण त्यावेळी 1848 मध्ये सावित्रीबाई फुले आणि फातिमा शेख मुळे घेता आले आणि आज आपल्याला सर्वच धर्मातील मुली मोठ्या प्रमाणात शिक्षण घेतांना आपल्याला दिसते आहे. मुलापेक्षाही मुली शिक्षणात पुढे जात आहे असे बोलले जाते. याचे सारे श्रेय सावित्रीबाई फुले आणि फातिमा शेख आणि जोतिबा फुले आणि उस्मान शेख यांच्या मैत्रीला जाते. मैत्री असावी तर यांच्या सारखी, ज्यांनी सुख, दुःख यांच्यात मदत केली ती मैत्री होय. आपल्या देशातील बांधव, महिला यांनी ‘मैत्रीचे नाते खऱ्या अर्थाने समजून घेत असतांना’...एकदा सावित्रीबाई फुले आणि फातिमा शेख यांच्याकडे आणि पुरुषांनी जोतिबा फुले आणि उस्मान शेख यांच्या मैत्रीकडे नजर जरूर टाकावी. ■■



**अविनाश टिपले**
मो. 9970917389

---

**अनंतायन**

## म्हातारपण दे गा देवा



ॲड. अनंत खेळकर
मो. 9370061677

जो जन्माला येतो त्याचा मृत्यू हा अटळ आहे. पण ह्या जन्म अन् मृत्युच्यामध्ये बालपण, तरूणपण अन् म्हातारपण अशा तीन पायऱ्या असतात. म्हातारपण हे वयानुसार येणारच पण ह्या वयात आजारपण, तसेच इतर शारीरिक व्याधी देखील असतात त्यामुळे म्हातारपणात काळजी घेणारा परिवार सोबत असला की म्हातारपणाच्या दुःखाची तिव्रता कमी होते. वृध्दापकाळात कशाचीही अपेक्षा उरत नाही. जर आईबाबांनी एखाद्या विषयावर आपले मत मांडले पण जर ते पटले नाही तरीही `हो! मी करतो` असे खोटे खोटे जरी म्हटले तरी त्यांना खुप आनंद होतो. मायबापाला आपल्या लेकरांनी कमावलेल्या पद, प्रतिष्ठा, संपत्ती तसेच इतर गोष्टी बघुन निश्चितच आनंद होतो, पण त्यांचा आनंद तेव्हा शतगुणित होतो जेव्हा सर्व परिवार आनंदी असतो. ह्या वयात त्यांचे म्हणणे ऐकुन घेणारी अन् प्रेमाचे दोनशब्द बोलणारी व्यक्ती त्यांच्याजवळ असली तरी पुरेसे असते. `दौलत नहीं, शोहरत नहीं, ना किसीकी वाह चाहिए। कैसे हो? बस दो लब्जों की परवाह चाहिए।' कोणत्याही मायबापाला म्हातारपणामुळे तेवढा कमकुवतपणा येत जेवढा त्यांच्या लेकरांनी त्यांच्याशी वाईट वर्तन केल्याने येतो. म्हातारपण ही ती अवस्था आहे ज्या अवस्थेत वय वाढायला लागते त्यावेळी कुटुंब, समाज नव्हे तर डोईवरचे केससुध्दा रंग बदलतात. आयुष्याचे कितीतरी उन्हाळे, पावसाळे , हिवाळे पाहीलेल्या वृद्धांजवळ आपल्या अनूभवातून मिळवलेल्या प्रश्नांची उत्तरे तयार असतात, पण दुर्दैव हेच असते की त्यांना कुणीही ह्या बाबतीत काहीच विचारत नाही. कारण त्यांच्या मते ही मंडळी कालबाह्य अर्थात आऊटडेटेड झालेली असतात. आयुष्यभर जंगलाचा राजा म्हणून वावरणारा सिंह जेव्हा म्हातारा होतो तेव्हा त्याची आयाळ गळून पडते. दात पडतात. नखे पार झिजून जातात. थकलेल्या सिंहाला शिकार करता येत नाही तेव्हा तो सततच्या उपासमारीमुळे दिवसेंदिवस खंगत जातो. एकवेळ अशी येते की त्याला बघुन पळणारे कोल्हे, कुत्रे अन् लांडगेही त्याच्या शरीराचे त्याच्या जिवंतपणीच त्याच्या देहाचे लचके तोडतात. अंगावरील जखमांमध्ये अळ्या तयार होतात अन् अखेरीस हा जंगलाचा राजा विव्हळत विव्हळत मरणयातना भोगतो. आपले मरण आपल्याच डोळ्यांनी हतबलपणे बघत केविलवाण्या परिस्थितीत मरण पावतो. म्हणून म्हणतात जगावे तर सिंहासारखे पण त्याच्या वाट्याला आलेले मरण मात्र वैऱ्यालाही येवू नये. म्हातारपणी विस्मरण होणे, चिडचिडेपणा वाढणे, हातापायातील शक्ती क्षीण होणे, ऐकु न येणे, दृष्टी कमजोर होणे अशा एक ना अनेक समस्या निर्माण होतात. म्हणूनच त्यांची जबाबदारीने देखभाल करणारी व्यक्ती त्यांच्या जवळ असणे आवश्यक आहे. पण काही उदाहरणे आपण पाहतो की, ज्या मायबापांनी आपल्या लेकरांच्या सर्व ईच्छा, आकांक्षा त्यांची ऐपत नसतांनाही पूर्ण केल्या, अशा मायबापाचे त्यांच्या मुलांना ओझे वाटू लागते. जेव्हा एखादे मुल रडू लागते तेव्हा सर्व शेजाऱ्यांना त्याच्या रडण्याचा आवाज येतो. पण परिस्थितीने रंजल्या गांजल्या गेलेल्या आईवडीलांच्या रडण्याचा आवाज भिंतीलाही ऐकु येत नाही. एक म्हातारी आई म्हणाली `मुले शिव्या देतील म्हणून खोकल्याची उबळही दाबून टाकावी लागते'. `सुना है वो हर दर्द, सीने में छुपाएँ बैठा है।, बेजान पत्तों की तरह मुरझाएँ बैठा है। यकिनन वो किसी का बुढ़ा बाप है, जो अपने जवान बेटों से ठोकर खाए बैठा है` अशी परिस्थिती ज्या आईवडीलांवर आली तर त्यांच्या मनात हाच विचार येत असेल की, पाऊस निघुन गेल्यावर छत्रीचेही ओझे वाटते. आपलीही तीच गत झाली आहे. आई बाबांच्या डोळ्यात ह्या दोन गोष्टीमुळे अश्रु येतात. जेव्हा मुलगी घर सोडून जाते अन् जेव्हा मुले त्यांच्याकडे पाठ फिरवतात तेव्हा. मायबापांवर वृध्दीश्रमात जाण्याची वेळ येते तेव्हा त्यांना काय वाटत असेल? काहीजण तर आईवडीलांना चक्क घराबाहेर काढून टाकतात. `बूढ़े माँ बाप को घर से निकाल रखा है ! अजीब शौक है बेटे का, कुत्तों को पाल रखा है` मायबाप एका विशिष्ट काळानंतर साधी तक्रारसुध्दा करीत नाहीत. कारण ` किसी को अपने अमल का हिसाब क्या देते? सवाल सारे ग़लत थे, जवाब क्या देते? ` हतबल झालेले मायबाप कधी कधी मुलांना म्हणतात `आम्हाला गुन्हेगार ठरवण्याचा तु त्रास का घेतो बाळा? तु फक्त सांगून टाक काय काय कबूल करायचे? आम्ही लगेच कबूल करतो. आपल्या कुटुंबासाठी उभं आयुष्य खर्ची घातलं, पै पै गोळा करून जे कमावले. ते सर्व आनंदाने मुलांच्या हवाली केल्यावर कधी कधी त्यांना हा प्रत्यय येतो की, आईवडीलांच्या संपत्तीची वाटणी तर होते पण आईबाबांना कुणी वागवावे? त्यांची वाटणी कशी करावी ? ह्यावरूनही वादविवाद होतात. एका वृध्द माऊलीवर असाच प्रसंग गुदरला होता प्रकरण न्यायालयात प्रलंबित होते. आईची ही अवस्था बघून न्यायालयातील शिपाई म्हणाला `माँ की दुआएँ कभी खाली नहीं जाती, भगवान से भी उसकी बात टाली नहीं जाती। अपने सब बच्चे पालती है बर्तन माँजकर, और बच्चों से एक माँ पाली नहीं जाती' हे विदारक वास्तव आहे. यशस्वी पुरूषाच्या मागे त्याच्या म्हाताऱ्या बापाने खर्च केलेले तारूण्य असतो. ह्याचा जेव्हा विसर पडतो तेव्हा काय होते? `जिन्हें बनाने में उम्र कट गई, उन मकानों की छांव भी बट गई ` एक वृध्द माता आपली व्यथा सांगतांना हुंदका आवरत फक्त एवढंच म्हणाली `बाळा! मी तर माझे सर्व आयुष्य तुझ्या नावाने केले, पण माझ्या लेकरा तु तर माझ्या हिश्शाचा वेळसुध्दा मला देवू शकत नाही. असे काही कानावर आले की, सहजीकच मनाला हा प्रश्न अस्वस्थ करतो की, माणूस सरणाची पुजा करतो, त्याच्या अस्थींची पुजा करतो, राखेची पुजा करतो, एवढेच काय तो प्रेताचीही पुजा करतो? मग जिवंत माणसांचा का तिरस्कार करतो? स्मशानातील एका चबुतऱ्यावर लिहीलेल्या ह्या ओळी बरंच काही सांगून जातात. कुणाबद्दल काय तक्रार करावी? `यातना देणारेही आपलेच होते अन् पुरणारेही आपलेच होते` कुणाच्या मृत्युनंतर `Miss you` लिहील्यापेक्षा जिवंतपणी `With you`लिहीणे कधीही चांगले आहे. जिंदगी में उपरवाले से माँगना है तो यही माँगता हूँ ! `माँ, बाप के बिना कोई घर ना हो! और कोई माँ बाप बेघर ना हो।` ■■

---

# आदिवासींमधील जातीयता आणि सामुदायिक शक्ती

*आदिवासींमध्ये जातीयता म्हणजे भेदभाव, उंच-नीच, मोठा अपराध समजायला हरकत नाही. कारण आदिवासी हा निसर्ग पुजक आहे. निसर्गपूजा विज्ञानाचा भाग आहे. आदिवासीची ओळख सांस्कृतिक मुल्यांमुळे आहे. त्याची जीवनशैली मानवता आणि समानतावर अवलंबून आहे. आदिवासी गणपद्धतीचा हिस्सा आहे. आदिवासीचा कोणत्याही धर्माशी, मुर्तिशी, मंदिराशी, जातीशी संबंध नाही. कारण धर्म हा धंदा आहे. जात-पात लोकांना वाटण्यासाठी आहे. मंदिर, मुर्ति, या लोकांमध्ये भिती निर्माण करण्याचे साधन आहे, अवतार आहे.*

मित्रांनो कधीही कोणतीच जात नीच होत नाही. ज्या धर्मामध्ये एखाद्या जातीला नीच मानन्यात येते, तो धर्मच नीच असतो. आमच्या गोंडीयन समाजात अनेक गणाचे, कबलाई जमातीचे मुळनिवासी लोक आहेत. यातील एखादी जमात, दुसऱ्या जमातीला नीच समजत असेल तर, हे समजायला हरकत नाही की, तो स्वतःच्या जमातला, गणाला कलंकित करते आहे. तो पूर्ण गोंडियन समुदायाला कलंकित करत आहे. पूर्ण मुळनिवासी समुदायाला कलंकित करत आहे. कारण त्या जमातीला, गोंडियन समुदायाने असे कोणतेच अधिकार दिलेले नाही, ती जमात मुळनिवासीयांचा अपराध आहे.

आज आदिवासी जीवंत आहे तरी, नोकरी, शिक्षण किंवा उद्योगांमुळे नाही तर, थोडीसी जमिन त्याच्या पदरात आहे. म्हणून त्याचा उपयोग करून तो कसे बसे आपला उदरनिर्वाह करित असतो. अशा दयनिय स्थितीत असतांना सरकार जमीनीबाबत नवीन नवीन कायदे बनवून त्याचे जमीनी अधिग्रहण करीत आहे. त्यामुळे आदिवासी मोठ्या प्रमाणात विस्थापित होत आहे, विरोध केल्यास नक्सलवादचा कलंक, धर्मांतरणाचा कलंक त्याच्या डोक्यावर आहे. आदिवासी जातियतेत विखूरलेला असल्यामुळे विरोध शक्य नाही. आज त्यांचेकडे धर्मकोड नाही, प्रत्येक जमात आपले वेगवेगळे धर्मकोड मागत आहे. यामुळे सरकारला आदिवासींना वाटणे सोपे झालेले आहे. (आता पर्यंत 83 ची मागणी) एक म्हण आहे, ‘कमजोर वर्गपर काम कम और राजनिती ज्यादा होती है’ हीच गोष्ट तंतोतंत आदिवासींवर लागू होत आहे. राजनितीक पक्ष आदिवासींना कमजोर वर्ग समजतात, यामुळे त्यांच्या आर्थिक धोरणावर, विकासावर, शैक्षणिक विकासार्थ पाहिजे तसे ठोस कार्य करत नाही. आदिवासी संघटीत नाही, त्याची सामुदायिक शक्ती निर्माण न हो, यासाठी राजकीय पक्ष त्यांच्या जातीगत पक्ष निर्मितीसाठी, चालविण्यासाठी नेहमीच मददगार असतात. राजकीय जागृति नसल्यामुळे जनता आणि छुटभैय्या नेतेही त्यांच्या जाळ्यात सहजासहजी फसून जातात. सत्तेत असणारे सरकार त्यांचेसाठी योजना तर बनवतात, परंतू योजनांचा पूर्ण लाभ त्यांना देत नाही, बजेटचा पैसा अन्यत्र नेतात. आदिवासी या देशाचा मूळनिवासी आहे. मागे-पुढे-खाली-वर किसी नाही, तरीदेखील भारतीय संविधानात आदिवासीला जमाती(ट्राईब) शब्द दिलेत, घोर अन्याय झाला. हे घडण्याचे कारण, आदिवासींच्या सांस्कृतिक मुल्यांचा त्याठिकाणी विचार झालाच नाही. 9 ऑगस्ट विश्व मुळनिवासी दिवसाला भारत सरकार मान्यता दिलेले नाही. समाजाचे जनप्रतिनिधी यावर बोलायला तयार नाहीत, काय आम जनतेचा आवाज सरकार ऐकणार? ज्यांचेकडे ना पावर आहे, ना पोजीशन आहे. 6 जुलै 1997 ला बोगस, अतिक्रमणकारी, घुसपैठीऐ आदिवासींच्या विरोधात एक उत्तम प्रकारचे निर्णय सर्वोच्च न्यायालयातर्फे आले. आज पर्यंत दोषींवर ना केंद्र सरकारने, ना राज्य सरकारांनी कोणतीच कार्यवाही केलेली नाही. आदिवासींचे विस्थापन थांबविण्यासाठी व पुर्वजांच्या संपत्तीची सुरक्षा हेतू स्थानिक जल, जंगल, जमीनीच्या मुलभूत अधिकाराचा लाभ घेण्याकरिता बनविण्यात आलेली 5 वी अनूसूची सरकारे लागू करीत नाहीत. हे लागू करवून घेण्यासाठी जी लढाई लढायची आहे, ते काय बाहेरचे लोक लढणार? सामाजिक योजना, आर्थिक योजना, आरक्षण, राजनितीक बाबी, जातीच्या नावावर मिळत नसतात, जातींच्या समुहावर मिळत असतात. या नंतर या सर्व सुख सोई आदिवासींच्या अधिकारांपासून झपाट्याने दूर होत चाललेले आहे. काय जातीचे झेंडे गाढणारे लोक, जातीय संघटना काढून राजनिती करणारे लोक, अशा सरकारांना धडा शिकविण्याचे धाडस करतील? सत्तेत असणारे काही लोक आज आदिवासींच्या धर्मांतरणावर बोलत आहेत.





डॉ. बाबासाहेब आंबेडकर जेव्हा संविधान तयार करीत होते, तेव्हा त्यांना पण माहित होते की, काही आदिवासी भारतात धर्मांतरीत आहे आणि ते त्यांच्या गरिबीमुळे, दारिद्र्यामुळ, बिमारींच्या अडचणीमुळ, जातीय भेदभाव, अत्याचारामुळे, शिक्षणाच्या अभावामुळे मजबुरीने धर्मांतरीत आहेत, हे माहित होते. म्हणून त्यांना अडचणीत टाकणारा कायदा न बनवता, सोईस्कर कायदा बनवला. आदिवासी कोणताही धर्म घेवू शकतो, आरक्षण कायम राहील. यामुळे हिनदीन आदिवासी आरक्षणाचा लाभ घेवून, शिक्षणाचा लाभ घेवून, शासकीय योजनांचा लाभ घेवून आपली आर्थिक बाजू काही प्रमाणात सावरण्याचा प्रयत्न केला आहे. त्याला सामाजिक क्षेत्रात, शैक्षणिक क्षेत्रात, राजकीय क्षेत्रात, रोजगाराच्या क्षेत्रात 7/0:5 प्रतिशत आरक्षण आहे, याच्यातही अर्धा टक्क्यावर अतिक्रमण आहेत. यावर आदिवासी न्याय मागत आहे, न्याय तर देत नाही, उलट धर्मांतरीत आदिवासींना आरक्षणातून बाहेर काढा, असा तगादा, आरडाओरड मोठ्या प्रमाणात सुरू आहे. याला डिलिस्टिंग (सुचीमधून बाहेर) असे नाव देण्यात आलेले आहे. त्यात समाजाचे कडाही भाडोत्रीपण सामील आहेत, धर्मांतरीत लोकांची संख्या जवळजवळ 3 ते 4 टक्का आहे, जर हा टक्का 7/0:5 कमी झाला तर उरेल किती 3/0:5 टक्का. अतिक्रमणांवर न्याय नाही मिळत आहे, मग खऱ्या आदिवासींच्या हिस्यात येणार किती हे गणित सत्ताधारींना माहीत आहे. धर्मांतरीत शिक्षा-दंड हा भाग यात गौण आहे, मुख्य हेतू आरक्षण संपल्यामुळे कमी झालेली संख्या जनरल कोट्यात न्यायची आणि सामान्य कोट्यातील लोकांचे भविष्य उज्वल करायचे.

जाती-पातीच्या भानगडीत पडणाऱ्या शिक्षित माणसाला हे समजेल का? समजले तर आपले व आपल्या पुढच्या पिढीसाठी हातपाय चालविण्याची ऊर्जा तयार राहील काय? याठिकाणी शिक्षित आदिवासी माणसाला हे विचार करण्याची खूप गरज आहे की, धर्मांतरीत आदिवासींचा विरोध करणाऱ्या संस्थांनी, संघटनांनी आणि समाजातील भ्रमीत लोकांनी कधीकाळी तरी आदिवासींच्या हक्क अधिकारासाठी, त्यांच्या आरक्षण भर्तीसाठी बेरोजगारीसाठी, जल, जंगल, जमीन वाचविण्यासाठी अतोनात झालेल्या अत्याचाराच्या विरोधासाठी, भाषा-संस्कृती वाचविण्यासाठी मुळनिवासींची ओळख वाचविण्यासाठी कधीतरी आंदोलने, संघर्ष या लोकांनी केले आहे काय?

शिक्षण शास्त्री शंभूकचा वध करणारे, शक्तीमान लोक आणि बेजोड, महान धनुर्धारी एकलव्याचा अंगठा कापणारे द्रोणाचार्य आजही सक्रीय आहेत. सत्तेपासून खूप दूर आपण आहोत. सामना कसा करता येईल, यांची गांभीर्याने विचार करण्याची वेळ आलेली आहे. एका बोटाने पकड एवढी मजबूत होत नाही, पकड मजबूत करण्यासाठी पाचही बोटांचा उपयोग करावा लागतो, आदिवासींच्या सामुदायिक शक्तींचा विचार करतांना हे मोलाचे मंत्र जपणे गरजेचे आहे. भारतातील 750 जमातींनी यावर विचार केला नाही तर मावा नाटे मावा राजचे स्वप्न तर साकार होणारच नाही, परंतू आदिवासींचे अस्तित्वच धोक्यात आल्याशिवाय राहणार नाही. ■■

**प्रभूलाल परतेती**
मो. 9422818921

बहुजन सौरभ
BAHUJAN SAURABHA






## करुणा बुद्ध विहार

करुणा बुद्ध विहार करुणानगर, नागपूर येथे रोज सकाळी-सायंकाळी वंदना होत असते. विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येत असते. विहार परिसरातील उपासक-उपासिका यांचा सहभाग असतो. महापुरुषांच्या जयंती पुण्यतिथी सुद्धा या विहारात करण्यात येत असतात. वर्षावास काळात बुद्ध आणि त्यांचा धम्म या ग्रंथाचे वाचन सुरू आहे.

संवाद मित्र, कृष्णा बोरकर
मो.7620358959

# फॅसिझम संपवण्यासाठी खऱ्या भारतीयत्वाची जाणीव महत्त्वाची : डॉ. यशवंत मनोहर

## डॉ. मनोहरांच्या दोन ग्रंथाचे प्रकाशन

**नागपूर :** भारतीय लोकांनी भारतीय संविधानाला अभिप्रेत असणारे भारतीयत्व समजून घेतले पाहिजे. आपण जर हे समजून घेतले तर फॅसिझम नष्ट होईल आणि लोकशाही स्पष्ट होईल. भारतीयत्व म्हणजे इहवादी, विज्ञाननिष्ठ, सलोखा, बंधुभाव, विषमतातितता आणि शोषणातितता अशी जाणीव आहे असे प्रतिपादन डॉ. यशवंत मनोहर यांनी केले. ते 'भारतीय संविधान आणि भारतीयत्व', 'कविवर्य भाऊ पंचभाई' या दोन पुस्तकांच्या प्रकाशन समारंभात बोलत होते. अध्यक्षस्थानी ज्येष्ठ समाजसेवक गिरीश गांधी होते. पुस्तकांचे प्रकाशन माजी मंत्री डॉ. नितीन राऊत यांच्या हस्ते करण्यात आले.

डॉ. मनोहर म्हणाले, तथागत बुद्धांच्या श्रमण संस्कृतीमधून आजच्या भारतीयत्वाचा प्रारंभ झाला आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी भारतीय संविधानात त्याचे निष्कर्षरूप साकारले आहे. भारतीयत्व स्त्रीपुरूष विषमता, अस्पृश्यता, जातीयता मानत नाही. आपण माणूस म्हणून या दुनियेचे एकमेव महानायक आहोत आणि हे महानायकत्व नष्ट करणारी प्रत्येक गोष्ट अभारतीय आहे, म्हणून मनुस्मृती अभारतीय आहे. नरकाची संकल्पना ही जगातील सर्वात मोठी दहशतवादी गोष्ट असल्याचे त्यांनी सोदाहरण पटवून दिले. समारंभाचे अध्यक्ष गिरीश गांधी म्हणाले, भारतीय राजकारणाच्या भयंकर वास्तवाला भारतीय समाजाची ढासळलेली नितीमत्ता कारणीभूत आहे. लोकशाहीचे महत्त्वाचे स्तंभ बेजबाबदार झाल्याने लोकशाही धोक्यात आली आहे. नैतिक मूल्यांशिवाय केलेल्या राजकारणातून काहीही चांगले निर्माण होण्याची शक्यता नाही. महाराष्ट्र जनसुरक्षा कायदा हा लोकशाही संपुष्टात आल्याचेच उदाहरण आहे. सामान्य माणसाच्या हिताची जनआंदोलने थांबल्याची खंतही त्यांनी यावेळी व्यक्त केली. 'संविधान आणि भारतीयत्व' या पुस्तकावर डॉ. अनमोल शेंडे यांनी तर 'कविवर्य भाऊ पंचभाई' या पुस्तकावर डॉ. प्रकाश राठोड यांनी अभ्यासपूर्ण भाष्य केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. शैलेंद्र लेंडे, संचलन प्रशांत वंजारे आणि आभार डॉ. कोमल ठाकरे यांनी मानले. यावेळी ज्योतीक ढाले, सुशिल मेश्राम, सर्जनादित्य मनोहर, करन सातपुते, शेरू सैय्यद, युवराज मानकर, खेमराज भोयर, समीता पंचभाई, मॅक्झिम मनोहर आदी प्रामुख्याने उपस्थित होते.



> 'भारतीय संविधान आणि भारतीयत्व' या पुस्तकाचे प्रकाशन केवळ एका ग्रंथाचे प्रकाशन नव्हे तर भारताचे खरे स्वभान उलगडणाऱ्या प्रज्ञेचे अनावरण आहे. हजारो वर्षांची गुलामी मोडतांना डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी या देशाचे नवे भविष्य लिहिले त्याचा अर्थ समजून घेण्यासाठी 'भारतीय संविधान आणि भारतीयत्व' हा ग्रंथ उजेडवाटेचे काम करेल.
>
> – माजी मंत्री डॉ. नितीन राऊत

## महत्वाचे

### धम्मदायीका स्मृतीशेष मंजुळाबाई राहाटे यांच्या 113 व्या जयंतीनिमित्त आदरांजली



**नागपूर :** वटथाई इंडियन बुद्धिस्ट मोनेस्ट्री, मंजुळाबाई राहाटे लेआऊट, प्रतापनगर नागपूरच्यावतीने या भूमीच्या दानदात्या व नागपूरच्या धम्मक्रांतीनंतरच्या प्रचारप्रसार करणारे धम्मानुदेशक प्रा. डॉ. ॲड. भदन्त सिवलीबोधी, भदन्त धम्मविरानुवंत्त महाथेरो, भदन्त सदानंद महास्थविर, भदन्त धिरधम्म महास्थविर, भदन्त प्रज्ञापाल महास्थविर, डॉ. भदन्त संघसेन शास्त्री यांच्या माध्यमातुन भारत थायलंड मैत्रीला गती देणारी धम्मदायीका स्मृतीशेष मंजुळाबाई राहाटे यांच्या 113 व्या जयंतीनिमित्त आदरांजली कार्यक्रम वटथाई, प्रताप नगर, येथे आज घेण्यात आला. यावेळेस वटथाई संस्थेचे अध्यक्ष भदंत नागदिपांकर महास्थवीर यांनी आपले मनोगत व्यक्त केले. संस्थेचे सचिव भिक्षुणी सूर्या तसेच उपासक उपासिका गीता लोखंडे, मिलिंद मानकर, राहुल मेश्राम, नरेश लोखंडे, सुधा रहाटे, गौतमी रहाटे, हरिचंद्र भगत, कुंदा वैद्य उपस्थित होते.

### आदर्श बुद्ध विहारात झाला 'संविधानाचा गजर'



**संवाद मित्र-आंचल लोखंडे, वाडी :** बुद्ध विहार समन्वय समिती आणि आदर्श बुद्ध विहार आदर्श नगर वाडी यांच्या संयुक्त विद्यमान वर्षावास कालावधी दरम्यान पालीभाषा प्रशिक्षण वर्गाचे आयोजन करण्यात आले आहे. याच अंतर्गत दर रविवारी विविध प्रबोधन पर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येत असून भारतीय संविधानावर प्रबोधन पर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमात व्याख्याते डॉ. अरविंद माळी, डॉ. प्रकाश राठोड आणि डॉ. विक्रम आदित्य मनोहर यांनी उपस्थित उपासकांना भारतीय संविधानाच्या माध्यमातून व्यक्ती समाजाने देशाचा विकास कसा साधला जाऊ शकतो आणि भारतीय संविधानाचे संवर्धन रक्षण आणि प्रचार प्रसार या विषयावर अभ्यासपूर्ण मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे संचालन सुनिता बोरकर, आयोजन सिद्धार्थ लोखंडे, मनोगत करुणा निकोसे, सहकार्य बाबाराव शेंडे, पुरुषोत्तम भस्मे आणि आभार प्रदर्शन अनिरुद्ध चिमणकर यांनी मानले.

## टेक ऑफ लेडीज क्लब तर्फे श्रावण सोहळा साजरा



**नागपूर :** श्रावण महिन्यात मातीला नवीन अंकूर फुटून झाडे वेली फुले पाने यांना बहर येतो. शेतकऱ्यांसाठी तर हा महिना फार महत्त्वाचा असतो, बळीराजा या श्रावणात धान्याची पेरणी करतो व देशाला संपन्न करतो. याच श्रावणाचे आभार मानण्यासाठी टेकऑफ्स लेडीज क्लब नागपूर तर्फे यंदाही श्रावण सरी सोहळा साजरा 2 ऑगस्टला करण्यात आला. या कार्यक्रमाचे अध्यक्ष प्रिया घोडमारे, मार्गदर्शक डॉ. प्रियतमा दास, प्रमुख अतिथी गयाबाई खंडारे, नीलम सोइन, डॉ. शारदा वैद्य, मिनू हेडाऊ हे होते. श्रावण महोत्सवात विविध कायक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये गीत गायन, उखाणे, नृत्य विशेष म्हणजे श्रावण क्वीन स्पर्धा हे या कार्यक्रमाचे खास आकर्षण होते. या कार्यक्रमाचे परीक्षण प्रीती तिरपुडे व यामिनी वाट यांनी केले. क्वीन स्पर्धेची विजेती स्नेहा हरडे तर द्वितीय मीनाक्षी चौके ही ठरली. कार्यक्रमाच्या मार्गदर्शक व अध्यक्षांनी श्रावणाचे महत्त्व व येणाऱ्या काळात पर्यावरण पूरक उपाय यावर मार्गदर्शन केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी अनिता पंधरे , सीमा पैठणकर, प्रज्ञा कांबळे तसेच मृदुला वाघ, सारिका हुसेन, ज्योती लिखार, मीनाक्षी झाडे, वृंदा खंडारे, प्रतिभा चेन्ने, माधुरी पेंदाम, पुष्पा नंदनवार, मंगला भुरे व टेक ऑफ लेडीज क्लबच्या सदस्यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे संचालन शालिनी मेश्राम तर आभार करिष्मा समर्थ यांनी केले.

## दक्षिण नागपूर बीआरएसपी प्रभाग कार्यालयाचे उद्घाटन

**नागपूर :** बहुजन रिपब्लिकन सोशालिस्ट पार्टी दक्षिण नागपूर विधानसभेतील प्रभाग 29 च्या जनसंपर्क कार्यालयाचे उद्घाटन बी आरएसपीचे राष्ट्रीय अध्यक्ष ॲड. डॉ. सुरेश माने यांच्या हस्ते करण्यात आले.



याप्रसंगी बोलताना डॉ. सुरेश माने म्हणाले की, बी आर एस पी पक्ष स्थापन झाल्यापासून सातत्याने बहुजन समाजाच्या ज्वलंत समस्या घेऊन संघर्ष करीत आहे. पक्ष चळवळीत निष्ठावंत कार्यकर्ते असल्यामुळे साधनांचा अभाव असूनही कार्यकर्त्यांच्या परिश्रमातून आणि त्यागामुळे महाराष्ट्रात सर्वत्र बीआरएसपी कार्यालयाचे जाळे तयार होत आहे. दक्षिण नागपूर बी आर एस पी चे अध्यक्ष संतोष ठवरे यांनी प्रभागातील जनसंपर्कासाठी आपले स्वतःचे घर उपलब्ध करून दिले. त्याबद्दल डॉ. सुरेश माने यांनी त्यांचे कौतुक केले.

यापसंगी राष्ट्रीय उपाध्यक्ष रमेश पाटील, विदर्भ प्रदेश महिला आघाडी प्रमुख विश्रांती झांबरे, एस.टी. पाझारे, माया मेश्राम उपस्थित होते. कार्यक्रमाचे संचालन जिल्हा समन्वयक गुलचंद रंगारी यांनी केले. प्रास्ताविक संतोष ठवरे यांनी केले तर आभार प्रदर्शन मनोरंजन फुलझेले यांनी केले.

## सेंट्रल जेलमध्ये जन्मलेल्या डॉ. तुकाराम बोरीकर यांचा सत्कार



**हिंगणा :** लक्ष्मीनारायण नगर, महाजनवाडी, वानाडोंगरी येथील रहिवासी डॉ. तुकाराम विठ्ठलराव बोरीकर यांचा पारतंत्र्यात नागपूर येथील सेंट्रल जेलमध्ये जन्म झाला व आईबाबासोबत ते दोन वर्ष 6 महिने तुरुंगात होते. अशा स्वातंत्र्य संग्राम सैनिक असलेल्या व वयाची अंशी वर्ष पूर्ण करणाऱ्या डॉ. तुकाराम बोरीकर यांचा महाजनवाडी परिसरातील एम्स इंग्लिश मिडीयम शाळेत भावपूर्ण सत्कार करण्यांत आला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी राष्ट्रीय समाजकल्याण प्रेरणा मंडळाचे अध्यक्ष विठ्ठल कोहाड होते. तर शाळा संचालक सेवानिवृत्त शिक्षक सिद्धार्थ शंभरकर, सेवानिवृत्त प्रा. दिपक रामटेके, प्राचार्या करुणा शंभरकर व सामाजिक कार्यकर्ते विनायक इंगळे उपस्थित होते. सर्वप्रथम स्वातंत्र्य संग्राम सैनिक डॉ. तुकाराम बोरीकर यांचा सत्कार करण्यात आला. सिद्धार्थ शंभरकर, प्रा. दिपक रामटेके तसेच विठ्ठल कोहाड यांनी आपल्या भाषणातून डॉ. बोरीकर यांच्या एकूणच जीवनकार्यावर प्रकाश टाकला. प्रास्तविक उपप्राचार्या रेश्मा धाडसे यांनी तर संचालन पुनम चतुरकर व आभार अलका दामले यांनी मानले. यावेळी शंकर सोनकुसरे, दिनेश पाटील, मोतीराम कडू, मनिषा बांते, तृप्ती ठाकरे व जांभुळकर उपस्थित होते. यशस्वीतेसाठी शालेय शिक्षिका व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

## धम्मचक्र प्रवर्तन दिन ऐरणीवर असतांनाही प्रशासकीय उदासीनतेने गाठला कळस..

# जिल्हाधिकारी कार्यालयावर समता मार्च धडकला

**नागपूर :** महसूल आयुक्त आणि जिल्हाधिकारी प्रशासनाने ही फिरवली पुर्वतयारी आढाव्याकडे सोईस्कर पाठ. भारतीय बौद्ध महासभा व विविध धार्मिक संघटनाच्या वतीने समता मार्च धडक मोर्चा जिल्हाधिकारी कार्यालयावर धडकला. धम्मचक्र प्रवर्तन दिनी येणाऱ्या लाखो भाविकांच्या सुखसोयी व सुविधा, सुव्यवस्था पाहू जाता, या वर्षीच्या मान्सुनची आक्रमकता आणि दुसरीकडे स्नान गृहे - तात्पुरत्या संडास बांधकाम उभारणीत दरवर्षी पेक्षा निम्मी होणारी संडास बांधकाम व्यवस्था भाविकांची गैरसोय करेल, याबद्दल स्थानिक प्रशासन यांचे लक्ष वेधण्यासाठी समता मार्च संविधान चौक ते जिल्हाधिकारी कार्यालय पर्यंत नेण्यात आला.

दहा ते पंधरा लाख अनुयायांना या वर्षीच्या 28 सप्टेंबर ते 02 ऑक्टोबर 2025 दरम्यान होणाऱ्या धम्मचक्र प्रवर्तन दिन कालावधीत देशभरातून येणाऱ्या भीम अनुयायांच्या संखेत मागील पांच वर्षाच्या तुलनेत दुप्पटीने वाढ झाली आहे.

दरवर्षी होणारी प्रचंड गर्दी पाहू जाता मनपा प्रशासन परिसरात होणऱ्या घाणीवर आणि त्यामुळे येणाऱ्या रोगराई वर नियंत्रण मिळवण्यासाठी आटोकाट प्रयत्न करुन मोठ्या प्रमाणात जवळपास 1000 ते 1050 स्नानगृहे आणि संडासची तात्पुरत्या स्वरूपात उभारणी दरवर्षी करायचे. तीही तोकड्या प्रयत्नांचा भाग यापुर्वी त्यासाठी व्यवस्था मागील काही वर्षांपासून सातत्याने करण्यात येत होती. प्रचंड गर्दीमुळे संडास - स्नानगृहांची संख्या यापूर्वीच्या अनुयायांच्या गर्दीला अपूरी पडायची. परंतु देशभरातून दीक्षाभूमी येणाऱ्या अनुयायांच्या संखेत मागील दोन तीन वर्षांत दुप्पटीने वाढ झाली असतांना तात्पुरते संडास उभारण्यात सुद्धा दिड पटीने 1500 ते 1600 च्या संख्येने त्या प्रमाणात वाढ होणे अपेक्षित असतांनाच, जेल प्रशासनाने भलीमोठी कंपाऊंड वॉल कायमस्वरूपी पक्की भिंत बांधून टाकली आणि त्या परिसरात बांधण्यात येणाऱ्या संडास बांधणी



कामात प्रचंड अडथळा निर्माण झाला. दुसरीकडे आयटी आय परिसरात बांधकाम सुरू असल्याने तिथेही मागील संखेत संडास बांधकाम करण्यात घट होणार आहे. दिक्षा भूमी परिसरात होणाऱ्या गर्दी मुळे तिथे ही संडास उभारणी संखेत घट होईल. परिणामी अनुयायांच्या संडास स्नानगृहे वापर बाबत गैरसोईत प्रचंड वाढ होईल असे स्पष्ट संकेत आहेत. मग एवढ्या मोठ्या प्रमाणात येणाऱ्या अनुयायांच्या स्नानगृहे आणि संडास (तात्पुरत्या स्वरूपात) वाढीव बांधकाम (अंदाजे 1500 ते 1600 यावर्षी करिता) संखेसाठी पर्यायी जागा उपलब्धता व्यवस्थेची पुर्व आखणी अद्यापही न झाल्यामुळे आम्ही जागरूक अनुयायी म्हणून आम्हाला चिंतेने ग्रासले असले तरी, या सर्व बाबींची जबाबदारी ज्या प्रशासनाची आहे ते आयुक्त आणि त्याचे अधिनस्त जिल्हाधिकारी गाढ निद्रेत असल्याचे जाणवते. नागपूर म.न.पा. प्रशासनावर सर्व जबाबदाऱ्या सोपवून आपली किमान आढावा घेण्याची ही प्रणाली तसदी घेतांना दिसत नाहीत. कारणं कारागृह प्रशासन, आयटी आय व दिक्षा भूमी परिसराच्या आसपासच्या संस्था आयुक्त आणि जिल्हाधिकारी प्रशासनाने दट्ट्या दिल्याशिवाय जुमानत नाहीत ही वस्तुस्थिती आहे.

त्यामुळे मुख्यमंत्री महोदय आयुक्त आणि जिल्हाधिकारी यांनी पाऊस आल्यावर लगतचे हे सर्व संस्था परिसर, शासकीय इमारती, डॉ. बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालयासह अनुयायांकरिता खूले करुन देण्याचे आदेश निर्गमित केले पाहिजे. विधानसभेच्या अधिवेशनात याविषयी प्रश्न उपस्थित केल्यावर तरी संबंधितांनी या संवेदनशील विषयाला गांभीर्याने घेणे अपेक्षित होते. परंतु पुर्वतयारी आढाव्याची एकही आढावा बैठक या उच्चतम अधिकाऱ्यांनी वा उच्च पदस्थ पदाधिकाऱ्यांनी सुद्धा घेतल्याचे आमच्या ऐकिवात नाही. वरीलपैकी सर्व बाबींचा आढावा घेऊन दीक्षाभूमीवर येणाऱ्या लाखो भाविकांच्या उपस्थितीतीचा व त्यांच्या सोई सुविधांचा विचार करून स्थानिक प्रशासनाला योग्य निर्देश द्यावे. दि.5 ऑगस्ट रोजी जिल्हाधिकारी यांचेशी 11 वाजता बैठक पार पडली. जिल्हाधिकारी डॉ. विपिन ईटनकर यांनी इंजी. पद्माकर गणवीर केंद्रीय संघटक भारतीय बौद्ध महासभा, राज्य संघटक भीमराव फुसे, जे.आर. गोडबोले, विजय मेश्राम, इंजी. ए. कुलदीप रामटेके, डॉ. अशोक उरकुडे, दिलीप बौद्ध, शिष्टमंडळ यांचेशी चर्चा करून निवेदन स्विकारले.

धरणा अंदोलनस्थळी विद्यापिठ नामंतर आंदोलनात 4 ऑगस्ट रोजी शहीद झालेल्या भीम सैनिकांना श्रद्धांजली देण्यात आली. वर्षा धारगावे, आनंद सायरे, पपिता खोब्रागडे, सरोज खोब्रागडे, गणवीर वानखेडे, भगवान कांबळे, विलास उंदीरवाडे, डॉ. स्वप्निल गणवीर, गौतम पाटील, देवीदास भांगे, इंजी. नंदलाल मेश्राम, अंकुश गणवीर, अरुण भारशंख, अमोल बनसोड, बी. के. हिवराळे उपस्थित होते. गंगाधर कांबळे यांनी पत्रकाद्वारे कळविले.

## बुद्ध धम्मातील शिलाच्या पालनात शारीरिक व मानसिक सुदृढता अवलंबून आहे : डॉ. अमोल दुबे




**नागपूर :** दी स्कूल ऑफ नोबल थॉट वर्षावासकालीन धम्म स्कूल अंतर्गत व्याख्यान क्रमांक 685 समाज भवन चारिका बुद्ध विहार शिल्पा सोसायटी, नागपूर येथे आयोजित करण्यात आले होते. या व्याख्यानासाठी डॉ. अमोल दुबे सहयोगी प्राध्यापक, औषधी विभाग, एम्स नागपूर यांना निमंत्रित केले होते. त्यांच्या व्याख्यानांचा विषय होता 'शारीरिक आणि मानसिक आरोग्यासाठी धम्माची भूमिका. या विषयावर त्यांनी शारीरिक आणि मानसिक आरोग्य टिकून ठेवण्यासाठी सहा घटकांची चर्चा केली. बौद्ध धर्मातील शेवटचे शील जे मादक पदार्थाविषयी आहे ते फार महत्त्वाचे आहे. त्या सगळ्यात शेवटच्या शिलाचा भंग झाला तर बाकीचे शील आपोआपच नष्ट होण्याची शक्यता असते. या सहाही घटकांची वैद्यकीय भाषेत वैज्ञानिक दृष्टिकोनातून स्पष्ट करून आपला विषय सोप्या व्यवहारिक उदाहरणाद्वारे त्यांनी उपस्थितांना पटवून दिला. या कार्यक्रमाचे अध्यक्ष एस.एन. मुळे म्हणाले की, शारीरिक रोग आणि मानवाची दुःखे यासाठी मानवी मनच कारणीभूत असते. तथागताने म्हटले आहे की, सगळ्या क्रिया कलापाचे केंद्र मानवी मनात असते. या मानवी मनाशी संबंधित धम्मपदातील गाथा सांगून त्यांनी आपले म्हणणे उपस्थितांना पटवून दिले. कार्यक्रमाचे संचालन प्रा. बीपी नारनवरे यांनी केले. आभार प्रदर्शन इंद्रजीत वासे यांनी केले.




## भारतीय संविधान सन्मानसाठी एक मराठा मैदानात



**नागपूर :** संविधान चौक नागपूर येथे दि.1/1/2022 पासून नियमित पणे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्मारकासमोर अनिश्चित कालीन धरना अंदोलन आज दि. 4 ऑगस्ट 25 ला 1313 वा दिवस सुरू आहे. भारतकुमार दा. सालुंके (मराठा) यांचे कुटूंबियावर झालेल्या अमानवीय, दुराचार, घृणास्पद जघन्य अन्याय, अत्याचारबाबत न्याय मागणी करता अनिश्चित कालीन धरणा आंदोलन करीत आहेत.




बहुजन सौरभ प्रकाशक, संपादक, मालक, मुद्रक सिध्दार्थ जीवन कांबळे यांनी देश प्रेस पब्लिकेशन, E-30/2, इंडस्ट्रीयल एरिया, सोनेगाव (सीम), हिंगणा, एम.आय.डी.सी., नागपूर - 440016 येथे मुद्रित केले व 9/2, स्वराज कॉलनी, मेडिकल कॉलेजच्या मागे, नागपूर-440027, येथे प्रकाशित केले. RNI No. MAHMAR 2020/84035 Printed, Owner by Siddharth Jiwan Kamble, Publisched at 9/2 Swaraj Colony, Behind Medical College, Nagpur 440027, Printed at M/S Desh Publication, E-30/2, Industrial Area, Sonegaon (SEEM), Hingna, MIDC, Nagpur-440016, Editor Siddharth Jiwan Kamble Email: bahujansaurabh@gmail.com Mobile: 9422860648